# ज्योतिर्मय
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५० वा ❑ भारतीय सौर दिनांक ०४ श्रावण शके १९४८, रविवार दि.२६ जुलै २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा हा लोकशाहीचा विजय

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

गेल्या अनेक दिवसांपासून दिल्लीच्या जंतर–मंतरवर सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टी अर्थात सीजेपीच्या आंदोलनाला प्रचंड मोठे यश मिळाले असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर राजीनामा दिला आहे. काहीही झालं तरी जोपर्यंत धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होत नाही, तोपर्यंत आम्ही माघार घेणार नाही, अशी भूमिका सीजेपीने घेतली होती. तरुणांनी आपले आंदोलन मागे घ्यावे यासाठी केंद्र सरकारने हर तऱ्हेने प्रयत्न केले. परंतु त्यात यश आलेच नाही. सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांना टायफाईड झालेला असला तरी त्यांनी मैदान सोडले नव्हते. त्याचाच परिणाम म्हणून धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाल्याचे बोलले जात आहे.

कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला दिवसेंदिवस पाठिंबा वाढत होता. कला, शिक्षण, मनोरंज क्षेत्रातूनही तरुणांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला जात होता. हे आंदोलन संपवण्यासाठी केंद्रीय आरोग्यमंत्री जेपी नड्डा यांनी सोनम वांगचूक यांची भेट घेतली होती. तसेच सीजेपीच्या प्रतिनिधींचीही त्यांनी भेट घेतली होती. अगोदर आम्ही कोणत्याही आंदोलक विद्यार्थ्यांवर कारवाई करणार नाही, सर्व गुन्हे मागे घेऊ असे केंद्र सरकारने सांगितले होते. तसेच नीट पेपरफुटीचा खटला हा जलदगती न्यायालयात चालवला जाईल, असेही खुद्द पंतप्रधान मोदी यांनी जाहीर केले होते. या आश्वासनानंतर सोनम वांगचूक यांनी आपले उपोषण सोडले होते. परंतु दुसरीकडे जंतर मंतरवर आंदोलन करत असलेल्या सीजेपीने मात्र आंदोलन कायम राहील. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झालाच पाहिजे, अशी ठाम भूमिका घेतली होती.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर २५ जुलै २०२६ रोजी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला असून हा राजीनामा लोकशाहीचा आणि युवाशक्तीचा मोठा विजय आहे. नीट युजी परीक्षा गैरव्यवहार आणि पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरातून झालेल्या तीव्र आंदोलनांच्या दबावामुळे धर्मेंद्र प्रदान यांनी हा निर्णय घेतला.

दिल्लीच्या जंतर–मंतर मैदानावर मागील महिन्याभरापासून कॉकरोच जनता पार्टी आणि इतर विद्यार्थी संघटनांचे अहोरात्र आंदोलन सुरू होते. सीजेपी चे संस्थापक अभिजित दीपके यांनी आजारपणातही आंदोलनाचे मैदान सोडले नाही, ज्यामुळे केंद्र सरकारवर मोठा राजकीय दबाव निर्माण झाला. पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांचे उपोषण आणि संसदेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी व काँग्रेसने घेतलेली आक्रमक भूमिका यांमुळे या मागणीला देशभरातून मोठी ताकद मिळाली होती. काँग्रेसचे नेते सचिन सावंत आणि इतर विरोधी नेत्यांनी पेढे भरवून या निर्णयाचे स्वागत केले आणि याला हुकूमशाहीविरोधातील लोकशाहीचा विजय असे संबोधित केले. धर्मेंद्र प्रधान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपला राजीनामा सोपवताना नीट युजी २०२६ प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारली आहे. आपल्या राजीनामा पत्रात त्यांनी नमूद केले की, देशातील तरुणांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये आणि अँटी–नॅशनल शक्तींनी जंतर–मंतरवरील परिस्थितीचा फायदा घेऊ नये, म्हणून आपण पद सोडत आहोत. मागील १२ वर्षांच्या मोदी सरकारच्या कार्यकाळात तीव्र जनआंदोलनामुळे एखाद्या मंत्र्याला अशा प्रकारे राजीनामा द्यावा लागण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे राजकीय विश्लेषकांकडून सांगितले जात आहे. नवीन शिक्षण मंत्री कोण येतात आणि ते परीक्षा घोटाळे रोखण्यासाठी काय ठोस पावले उचलतात, यावरच सिस्टीम खऱ्या अर्थाने बदलणार की नाही हे ठरेल. विद्यार्थ्यांचा लढा आता केवळ राजीनाम्यापुरता मर्यादित नसून सिस्टीम सुधारण्यासाठी सुरूच राहणार असल्याचे दिसते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता त्यांच्या जागी नवीन चेहरा येणार त्यामुळे फक्त चेहरा बदलला की अख्खी सिस्टीम बदलणार? हाच सर्वात मोठा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर आणि देशासमोर आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हे आंदोलनाचे पहिले मोठे यश असले, तरी संपूर्ण परीक्षा आणि शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी महत्त्वाचे बदल होणे किंवा सरकारकडून केले जाणे गरजेचे आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा व्यवस्थेच्या दुरुस्तीची पहिली पायरी आहे, अंतिम ध्येय नाही.

# “तुझ्या कमाईनं आज बापाची अब्रू वाचली !”


**ज्योतिर्मय साहित्य**

प्राचार्य सुनीलकुमार लवटे यांना प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या नावाचा पुरस्कार पुण्यात नुकताच देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यासाठी मी त्यांच्याबरोबर सातारा–पुणे आणि पुन्हा त्याच दिवशी पुणे–सातारा प्रवास केला. मला साताऱ्यात सोडून ते त्यांच्या कोल्हापूर गावी पहाटे तीनला पोहचले. प्रवासात त्यांच्याबरोबर झालेल्या गप्पांनी त्यांच्या शिक्षण घेत असतानाच्या बऱ्याच गोष्टी समजल्या. त्यांच्या गप्पांमधला महत्वाचा विषय म्हणजे त्यांचे गुरु ज्ञानपीठ विजेते वि स खांडेकर. पुरस्कार सोहळ्याच्या मनोगतात प्राचार्य सुनीलकुमार लवटे सांगत होते, तुम्हाला काही सांगता येत नसेल तर तुम्ही बोलू नये अशी माझी धारणा आहे. या कार्यक्रमात मी आनंद माडगुळकर यांना ऐकत होतो. माझ्या बरोबर तुम्ही त्यांचाही सत्कार केलात. ग.दि.माडगूळकर आणि मी अस जे नात आहे, ते आनंद माडगुळकर आणि ग. दि.माडगूळकर यांच्या पेक्षा अत्यंत जवळच नाते आहे. नाते अशा अर्थाने की, मी इयत्ता ११ वी ला कोल्हापूरच्या आंतर भारती विद्यालयात शिकत होतो. वि.स. खांडेकरांनी १९६३ साली देशातले नागरिक जबाबदार घडावेत म्हणून एक ध्येयवादी शाळा सुरु केली होती. पहिल्या दिवशी शाळेच्या उद्घाटना दिवशी वि.स. खांडेकरांना पत्रकारांनी प्रश्न विचारला, कोल्हापूरात ५१ शाळा असताना, ५२ वी शाळा का सुरु केली? तर ते असे म्हणाले की ५१ शाळा शिकवण्याच काम करतात ही ५२ वी शाळा माणूस घडवण्याच काम करेल. आपण शिक्षण संस्था कशासाठी चालवतो याचा नक्की विचार केला पाहिजे. आंतर भारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर संचलित आंतर भारती विद्यालय खांडेकरांनी जे कोल्हापुरात १९६३ साली चालू केले त्याची आमची ती पहिली बॅच होती. १९६७ साली आम्ही ११ वी ला बसलो होतो त्या वर्षी खांडेकरांनी आमच जे नवभारत नावाच पुस्तक होत त्या पुस्तका मध्ये जे लेखक आणि कवी जिवंत होते त्यांना ११ वीला असताना एक कार्ड खांडेकर यांनी पाठविल होत, आणि असं लिहिल होत की मी एक शाळा तीन वर्षापूर्वी सुरु केली त्याची पहिली बॅच यावर्षी ११ वी ला आहे. त्यांना नवभारत वाचन मालेत तुमची एकांकीका, तुमची कविता, तुमचा निबंध आहे आणि तुम्ही या वर्षात इकडच्या भागात काही निमित्ताने आलात, तर आमच्या शाळेतील अकरावीच्या मुलांना त्यांच्या पुस्तकातील तुमची कविता, निबंध, एकांकिका शिकवा. शिक्षकांची दृष्टी कशी असली पाहिजे त्याच ते उदाहरण आहे. वर्ष भर कोणी कोणी शिकवल आम्हाला?कुसुमाग्रजांनी शिकवल, ग.दि.माडगूळकरांनी शिकवल, अनंत काणेकरानी शिकवल, शांता शेळकेंनी शिकवल, एस. एम. जोशींनी शिकवल, ना.ग. गोरेंनी शिकवल.

दैवजात दुःखे भरता दोष ना
कुणाचा पराधीन आहे जगती पुत्र
मानवाचा

ही पाठ्यपुस्तकातील ग. दि.माडगूळकर यांची कविता स्वतः ग.दि. माडगूळकर यांनी येऊन शिकवली.

ग.दि.माडगूळकर यांनी म्हंटलेल तुम्ही ऐकलेल असेल, मी शिकवलेल ऐकल आहे आणि समृद्ध झालो आहे. कवी स्वतः एखादी कविता लिहितो आणि पुढे शिकवतो. कुसुमाग्रज कोलंबसचे गर्व गीत शिकवतात अशी कल्पना करा. सोनेरी मुंगुस ना. ग. गोरे शिकवत आहेत अशी कल्पना करा. मी समृध्द का झालो, तर मला असे शिक्षक मिळाले. आपल्याला कोण शिक्षक मिळतो याच्यावर आपली श्रीमंती अवलंबून असते, अशी माझी धारणा आहे. ग. दि.माडगूळकरांनी मला शिकवल पुढे मी कॉलेजला गेलो.



लवटे सरांच्या भाषणातील हे संभाषण शिक्षक आणि विद्यार्थी तसेच समाजाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. ग दि माडगूळकर यांच्या जीवनात वि स खांडेकर आले आणि त्यांचे जीवन समृद्ध झाले. ग दि माडगूळकर हे वि स खांडेकर यांचे लेखनिक होते. एका संध्याकाळी ग दि माडगूळकर यांचा धाकटा भाऊ त्यांच्याकडे आला. तो कुंडलहून आला होता. तो आला आणि एकाएकी रडू लागला. ग दि माडगूळकर यांचा जीव गुदमरून गेला. घराकडे काय झाले होते कोण जाणे ! मनसोक्त रडून घेतल्यावर, स्फुंदत स्फुंदतच भावाने त्यांना सांगितले, ‘‘वडिलांची नोकरी गेली. कुंडल गावात देणं फार झालं आहे. देणेकरी सामान हलवू देत नाहीत !‘‘ त्याने तीन वाक्यांत सारी व्यथा व्यक्त केली. ग दि माडगूळकर यांच्यापुढे महाभारत उभे राहिले. वडिलांचा दरिद्री पगार, दुखणेकरी आई, पाच भावंडे... एकाएकी नोकरी गेलेली...

ग दि माडगूळकर तरी काय करणार होते ? त्यांना जो पगार मिळत होता तो त्यांनाच पुरत नव्हता. ते वडिलांना साहाय्य करणार कशातून ? धाकट्या भावासारखे त्यांनाही रडू कोसळले. ते त्यांनी कटाक्षाने




आवरले. ते दिवसही पावसाळ्याचे होते. भावाला घरी जायला सांगून त्यांनी थेट वि स खांडेकरांचे घर गाठले. त्यांचा चेहेरा–मोहरा विलक्षणच झाला असला पाहिजे.

‘‘काय हो?‘‘ खांडेकरांनी त्यांना विचारले. ‘‘घरी वडील फार आजारी आहेत. मला गावी जायला पाहिजे. मात्र पन्नासएक रुपये....‘‘. भाऊसाहेब काही बोलले नाहीत. ते आत गेले आणि दहादहाच्या पाच नोटा आणून त्यांनी माडगूळकरांच्या हाती दिल्या. आभार मानायला माडगूळकर यांचेकडे शब्ददेखील नव्हते. वडिलांचे आजारपण ही त्यांची सबब साफ खोटी होती. पन्नास रुपये कुणी हातउसने द्यावेत अशी त्यांची सांपत्तिक परिस्थिती त्याकाळी खासच नव्हती. तरीही खांडेकरांनी त्यांना ते पैसे दिले. ते बाहेर पडले. पैसे परत कधी द्याल? हे खांडेकरांनी मुळीच त्यांना विचारले नाही. फक्त ते माडगूळकरांना म्हणाले, ‘‘घाबरू नका. आयुष्यात असे प्रसंग यायचेच !‘‘

भाऊसाहेब खांडेकरांनी दिलेल्या त्या पन्नास रुपयांवर वडिलांच्या कर्जदारांना ग दि माडगूळकर थोपवू शकले. गरीब कारकुनाला कर्ज ते किती असणार? त्यातले निम्मेअधिक कर्ज माडगूळकर चुकवू शकले. बाकीच्या कर्जाची हमी ग दि माडगूळकर यांनी घेतली. देणेकऱ्यांचा त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसू शकला. त्यांचे वडील, आई आणि भावंडे सुखरूप खेड्यापर्यंत जाऊ शकली. निरोप घेताना ग दि माडगूळकरांना पोटाशी धरून वडील गहिवरून म्हणाले, ‘‘तुझ्या कमाईनं आज बापाची अब्रू वाचली !‘‘

ग दि माडगूळकरांचे मन म्हणाले, ती कमाई माझी नव्हे दादा; ते पुण्य एका साहित्यिकाचे आहे. त्यांच्या लेखणीत आहे तेच त्यांच्या हृदयात आहे !

पन्नास रुपयांची ही गोष्ट श्री. भाऊसाहेब खांडेकर विसरूनही गेले असतील. मला मात्र ती कधीच विसरता येणार नाही.असे ग दि माडगूळकर यांनी लिहून ठेवले आहे. वि स खांडेकर आधी शिक्षक आणि नंतर साहित्यिक होते.

# संस्कृत कवी चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर : परंपरा आणि आधुनिकतेचा सेतू

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या वेगवान आणि बदलत्या युगात संस्कृत भाषा व साहित्य यांचे स्थान टिकवून ठेवणे ही एक मोठी जबाबदारी आहे. अशा काळात आपल्या काव्यलेखनातून आणि शैक्षणिक कार्यातून संस्कृतची पताका उंचावणारे कवी चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर हे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे येतात.

चन्द्रहास शास्त्री यांचे काव्य हे प्राचीन संस्कृत परंपरेचा सखोल वारसा आणि आधुनिक जीवनदृष्टी यांचा सुंदर संगम आहे. त्यांच्या रचनांमध्ये अध्यात्म, भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये आणि मानवी जीवनातील सूक्ष्म



भावविश्व यांचे प्रभावी चित्रण दिसून येते. त्यांच्या भाषाशैलीत साधेपणा असूनही गहनता आहे, जी वाचकाला विचारप्रवृत्त करते आणि अंतर्मुख बनवते. त्यांच्या काव्यातील भक्तीभाव आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्व हे विशेषत्वाने लक्ष वेधून घेतात.




परंतु शास्त्रीजींचे योगदान केवळ काव्यनिर्मितीपुरते मर्यादित नाही. शिक्षण क्षेत्रात त्यांनी शिक्षक व शिक्षक–शिक्षक म्हणून कार्य करताना बी.एड. व एम.एड. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. भारतीय ज्ञानपरंपरा (इंडियन नॉलेज सिस्टिम्स) या विषयावर त्यांनी अभ्यासक्रम विकसित करून कार्यशाळा, वेबिनार इ. माध्यमातून शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये नवी जाणीव निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यातून शिक्षणात मूल्याधिष्ठित दृष्टीकोन, संशोधनवृत्ती आणि संस्कृतप्रेम विकसित होताना दिसते.

आज शिक्षण आणि संस्कृती यांच्या संगमाची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवत असताना, चन्द्रहास शास्त्री यांचे कार्य या दोन्ही क्षेत्रांना जोडणारा एक महत्त्वपूर्ण दुवा ठरते. त्यांनी पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक शिक्षणपद्धती यांचा समन्वय साधून एक आदर्श निर्माण केला आहे.


समारोपतः, चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे कार्य हे केवळ एका कवीचे किंवा शिक्षकाचे नसून, ते भारतीय संस्कृतीच्या संवर्धनाचे एक व्यापक आंदोलन आहे. त्यांच्या साहित्यसेवेने आणि शैक्षणिक योगदानाने संस्कृत भाषेला नवे आयाम प्राप्त झाले असून, भावी पिढ्यांसाठी त्यांनी प्रेरणेचा दीप प्रज्वलित केला आहे. या दीपस्तंभाच्या प्रकाशात संस्कृत आणि भारतीय ज्ञानपरंपरा अधिक तेजस्वीपणे उजळत राहो, अशी ज्योतिर्मय परिवाराकडून शुभेच्छा!

चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर आपणांस ज्योतिर्मय परिवाराकडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

***









## जात्यावरच्या ओव्या......

पंढरीचा पांडुरंग
भाव भक्तीचा भुकेला
घेई कडेवर उचलून
माय जशी लेकराला ||७६१||

पंढरीचा पांडुरंग
डोळे भरून पाहीन
तुळस डोईला घेईन
पायी वारीला जाईन ||७६२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५६

ज्योतिर्मय साहित्य

**दिनाचा दयाळू, मनाचा मवाळू ।**
**स्नेहाळू कृपाळू, जनी दास पाळू ।**
**तया अंतरी क्रोध संताप कैचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।५६।**


अर्थ : जो अनाथ आणि दुःखितांवर प्रेम करतो, जो मनाने अत्यंत मृदू आहे, प्रेमळ आणि सर्वांवर कृपेचा वर्षाव करणारा आहे, तसेच शरणागताला आश्रय देणारा आहे आणि ज्याच्या अंतरात राग किंवा संताप यांना थारा नाही, असा परमेश्वराचा भक्त जगामध्ये खरोखरच धन्य होय.

( मवाळ - मृदू, स्नेहाळ - प्रेमळ, दास पाळू - शरणागताला आश्रय देणारा )

विवेचन : हा श्लोक ''जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा'' या पालुपद-मालिकेचा सुंदर समारोप आहे.

हा श्लोक वाचताना एक विशिष्ट लय आपोआपच प्राप्त होते. ळ ची पुनरावृत्ती याला एक वेगळेच सौंदर्य देते. परंतु हे केवळ भाषिक दृष्टीने जरी असले तरी अर्थाच्या दृष्टीने देखील हा श्लोक तेवढाच सुंदर आहे. जो भक्त भगवंताचा होऊन राहिला आहे, त्याच्यामध्ये काही गुणांचा परिपोष आपोआपच होत असतो. अशा भक्ताच्या अंगी कोणते गुण असतात ते समर्थांनी या श्लोकात सांगितले आहे.

संत हे भगवंताचे श्रेष्ठ भक्त असतात म्हणून संतांमध्ये वरील श्लोकातील गुण आपल्याला प्रकर्षाने दिसतात किंवा जाणवतात.







अत्यंत प्रेमळपणा हा संतांचा गुण! ते अनाथांची, दिनांची, दुःखी जनांची माउली होतात. संत एकनाथांनी तप्त वाळवंटात रडत असलेले हरिजनाचे मूल कडेवर उचलून घेतले. पूर्वजांचे श्राद्ध करीत असताना भुकेल्या हरिजनांना जेवू घातले, तृषार्त गाढवाच्या मुखी गंगेचे पाणी घातले. प्रसंगी परमेश्वर तरी कठोर होतो, परंतु संतांना मात्र सर्वसामान्यांचा अपार कळवळा असतो. दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी मी अवतार घेतो असे गीतेमध्ये भगवंत म्हणतात. परंतु ज्ञानेश्वर माउलींसारखे संत दुष्ट नाहीसे होवो असे म्हणत नाहीत तर दुष्टांचा दुष्टपणा नाहीसे होवो असे म्हणतात.

सर्वसामान्यांच्या त्रासाने संत संतापत किंवा दुःखी होत नाहीत. त्यांच्याजवळ अपार करुणा असते. मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास.. असे संत तुकाराम महाराज म्हणतात ते याचसाठी. संत कधी कधी कठोरपणे वागले किंवा बोलले तरी देखील त्यात लोककल्याणाची तळमळ आणि प्रेम असते. दास पाळू म्हणजे भगवंताच्या भक्ताला ते आश्रय देणारे असतात. **(क्रमशः)**




## भगवंताचे अनुसंधान कसे ठेवावे ?



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

ज्या गोष्टीचे अत्यंत प्रेम आहे तिचे अनुसंधान मनुष्याला आपोआपच राहते. ते इतके टिकते की ते अनुसंधान मला आहे ही जाणीवही राहात नाही. अनुसंधान ठेवतो असे म्हणताना मी त्याच्याहून वेगळा असतो; आणि प्रेमाचे जे अनुसंधान असते तिथे मी एकजीवच होतो. आपण कितीही गडबडित असलो तरी वाटेने जात असताना आपल्या नावाने कुणी हाक मारली की आपण वळून पाहतो. हे आपले अनुसंधान आहे; कारण या देहावर आपले इतके प्रेम आहे की मी त्याच्याहून वेगळा नाहीच ! असे देहाचे अनुसंधान कसे ठेवावे हे सांगावे लागत नाही. देहाचा विसर पाडा म्हणून सांगावे लागते, देहाचे स्मरण ठेवा म्हणून नाही सांगावे लागत !

आम्हाला भगवंताचे अनुसंधान ठेवायचे आहे. हा एक प्रकारचा अभ्यास आहे. भगवंताचे प्रेम वाढले तर अनुसंधान टिकेल. परिक्षा पास होण्याकरिता जसा अभ्यास करावा लागतो तसा भगवंताचे प्रेम वाढविण्याकरिता अभ्यास करणे जरूर आहे. यासाठी, जे जे काही मी करीन ते ते मी भगवंताच्या साक्षित्वाने करतो आहे ही जाणीव ठेवून करायला पाहिजे. आज आम्हांला नाना तऱ्हेचे उद्योग करावे लागतात. प्रपंच म्हटला म्हणजे किती गोष्टी कराव्या लागतात ! त्या सगळ्या करीत असताना भगवंताचे स्मरण ठेवून करणे, हे आपले खरे कर्तव्य आहे.

सर्कशीमध्ये आपण पाहतो ना ! वाघ, सिंह, घोडे, हत्ती जे काय प्राणी असतील ते खेळ खेळतात. घोडा कसा सुंदर नाचतो असे आपण म्हणतो ! पण त्या घोड्याचे लक्ष प्रेक्षकांकडे नसते. त्या घोड्याचे, त्या वाघाचे, त्या सिंहाचे लक्ष आतमध्ये चाबूक उगारणारा जो मनुष्य असतो त्याच्याकडे असते ना ? प्रेक्षक काय म्हणतील ते तो प्राणी पाहात नाही. आणि आपण काय करतो ? भगवंत काय म्हणेल हे पाहातच नाही, जग काय म्हणेल ते पाहतो ! हे जर आम्ही सोडले ना, तर भगवंताला काय हवे आहे ते आम्हाला बरोबर कळेल. भगवंताचे स्मरण ठेवून कर्म केल्याने त्याला काय हवे तेच आमच्या हातून घडेल. त्याचे संधान न सोडता कर्म करणे हे अनुसंधानाचे लक्षण आहे. हे कशाने होईल ? अत्यंत प्रेमाने होईलच.

एक बाई नुकतीच बाळंत होऊन सासरी आल्यावर तिने मूल पाळण्यात निजविले, आणि मागच्या परसामध्ये ती भांडी घाशीत होती. ते मूल थोडेसे कुठे रडले, घरात पुष्कळ माणसे होती, कुणाला ऐकू नाही गेले. ती पोरगी मात्र धावत पाळण्यापाशी आली, आणि मूल उठलेले दिसते आहे असे म्हणाली. काम करताना तिचे कान जसे पाळण्याकडे होते, तसे प्रपंच करताना आपले लक्ष मात्र भगवंताकडे असले पाहिजे. याचे नाव अनुसंधान !

अखंड मुखी रामनाम, आत असावे अनुसंधान, देहाने करावे प्रपंचाचे काम.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### वारीतील आनंद

संत तुकाराम महाराज
होय होय वारकरी/ पाहे पाहे रे पंढरी/
काय करावी साधने/ फळ अवघेची येणे/
अभिमान नूरे/
कोड अवघेची पुरे/ तुका म्हणे डोळा/
विठोबैसला सावळा //

आपल्या जातीच्या वर्णाचा पदाचा रूपाचा असा कुठलाही अभिमान न ठेवता ही वारी समाजातील सर्व स्तरावर असणाऱ्या व्यक्तींना एकाच पातळीत आणते. समोर दिसणारा वारकरी, तो मग तथाकथित निम्न जातीचा असला किंवा रूपाने बेडभ, काळाकुट्ट कसाही असला तरी, त्यात माझा हरी आहे. अवघे विश्व हेच हरी मय झाले आहे. या दिव्य अभ्यासाची वारी हे एक प्रमुख स्थान आहे. एकमेकांच्या पाया पडून आलिंगन देऊन वारकरी समोरच्या व्यक्तीत विठू माऊलीला पाहतात. प्रापंचिक कामे बाजूला ठेवून आपल्या जीवनात असणाऱ्या साऱ्या चिंता, पैशाची अडचण हे मनात न घेता पुढील पंधरा-वीस दिवस केवळ भगवंता साठी काढून ठेवायचे, ही आध्यात्मिक खूप मोठी शिकवण आहे. त्याचा अभ्यास दरवर्षी नित्यनेमाने न चुकता करावयाचा असतो. अशी वारी करा, आता तुम्हाला इतर साधने करण्याची आवश्यकता पडणार नाही. आपल्या पदाचा, रूपाचा, धनाचा, जातीचा गर्व इथे मोडून पडेल, आणि भगवत भेटीची मनोकामना इथून पूर्ण होईल. हेच महाराज सांगतात.
(क्रमशः)

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



**संवाद**

**संवाद हा पृथ्वीतलावरील सर्व जीवामध्ये होत असतो पण हल्ली मनुष्य संवाद हरवत चालला आहे, जेवढा एकमेकांशी संवाद वाढेल तेवढे प्रेम वाढेल म्हणून एकमेकांत संवाद होणे खूप आवश्यक आहे.**

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)




### धर्म आणि धार्मिकता

धर्म, धार्मिकता, ईश्वर व जीवन म्हणजे आपले आयुष्य याचा परस्पर संबंध काय आहे? आहे की नाही इथपासून ते आहेच इथपर्यंत हा विचार जातो, पण आज फक्त आपण 'धर्म व धार्मिकता' याविषयी बोलू, विचारकरु.. प्रथम धर्म हा शब्द अनेक अर्थी वापरला आहे.मग धार्मिकता म्हणजे काय? बघा पटते का? धर्म म्हणजे कार्य या अर्थाने राष्ट्रधर्म पितृधर्म इ.इ. मग आपण धार्मिकता व धर्म याला देशाशी का जोडतो?? का तर प्राचीन पुराण काळापासून ती कल्पना भावना आहे! जसे अर्जूनाला कृष्ण गीतेत म्हणतात,"यदायदाह धर्मस्यः "म्हणजे मित्रांनो येथे परमेश्वर म्हणतो, धर्म लयाला जातो, अनाचार पाप वाढते, तेव्हा मी अवतार घेतो.. कारण या धरतीवर, निसर्गात सर्व घटक आपापल्या धर्माचे पालन करतात. हाच विचार कुसुमाग्रज म्हणतात - ज्यांना देव हवा त्यांना तो श्वास आहे, नको त्याना भास आहे, आस्तीक नास्तीक वादात मी कधीच पडत नाही, आपल्या मान्यतेशिवाय देवाच काही अडत नाही. मग धार्मिकता म्हणजे काय तर आपले विहीत कर्म ते प्रामाणिकपणे करावं! इथं धार्मिकता म्हणजे जातीयवाद नाही, इथंच आपण चुकतो.. तर धर्मपालन म्हणजे स्वरक्षण, ऊन्नती व पर्यायाने राष्ट्रीय प्रगती.. कारण धर्मासाठी माणूस नाही तर माणसासाठी धर्म आहे! आज एवढे धर्मप्रवचन थांबवितो. गूडडे गूड मार्निंग आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा - माणसाचे.



## रक्तशुद्धी आणि त्वचेच्या सर्व समस्यांवर कडुनिंब आहे निसर्गाचे वरदान!

ज्योतिर्मय साहित्य

२. त्वचेचे सर्व आजार आणि इन्फक्शन गायब...

त्वचेवर येणारे लाल फोड, सततची खाज, खरुज, नायटा किंवा उन्हाळ्यातील घामोळे यावर कडुनिंबाचे पाणी म्हणजे एक जालीम उपाय आहे. हे पाणी त्वचेवरील सर्व हानिकारक बॅक्टेरिया मारून टाकते.

३. रोगप्रतिकारशक्ती (इम्म्युनिटी) वाढते...

कडुनिंब शरीराची आतून ताकद वाढवतो. हवामान बदलल्यामुळे होणारे संसर्गजन्य आजार, सर्दी-खोकला यापासून संरक्षण मिळते.

४. पोटातील जंतू आणि मधुमेहावर नियंत्रण... कडुनिंबाची पाने पोटातील जंतू नष्ट करून पचन सुधारतात, तसेच रक्तातील साखरेची पातळी (ब्लड शुगर ) नियंत्रणात ठेवण्यासाठीही ती खूप उपयुक्त ठरतात.

कसा करावा हा उपाय (वापरण्याची अत्यंत सोपी आणि योग्य पद्धत)...

कडुनिंबाचा पुरेपूर फायदा मिळवण्यासाठी तो खालील दोन पद्धतीने वापरता येतो...

१. कोवळी पाने चावून खाणे (रक्तशुद्धीसाठी)...

सकाळी उठल्यावर उपाशीपोटी कडुनिंबाची ४-५ कोवळी (लालसर किंवा फिकट हिरव्या रंगाची) पाने घ्या. ती मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुवून घ्या आणि थेट तोंडात टाकून बारीक चावून खा. पानांचा रस हळूहळू गिळा.

२. कडुनिंबाच्या पाण्याने अंघोळ (त्वचेच्या आजारांसाठी) ...

एका मोठ्या पातेल्यात पाणी घ्या आणि त्यात कडुनिंबाची १५-२० पाने टाकून ते चांगले उकळून घ्या. पाण्याचा रंग थोडा हिरवट झाल्यावर गॅस बंद करा. हे उकळलेले औषधी पाणी तुमच्या अंघोळीच्या कोमट पाण्यात मिसळा आणि या पाण्याने अंघोळ करा. साबणाचा वापर टाळल्यास अधिक उत्तम!

वॉर्निंग (वॉर्निंग - वापरताना घ्यायची काळजी आणि महत्त्वाची पथ्ये)...

हा पारंपरिक उपाय अतिशय सुरक्षित असला, तरी काही विशिष्ट गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे...

१. अतिसेवन पूर्णपणे टाळा...
कडुनिंब प्रकृतीने उष्ण आणि अतिशय कडक असतो. त्यामुळे रोज ४-५ पानांपेक्षा जास्त पाने खाऊ नका. तसेच, सलग १५ दिवस पाने खाल्ल्यानंतर पुढचे १५ दिवस खंड (ब्रेक ) द्यावा आणि नंतर परत सुरू करावे.

२. गरोदर महिलांसाठी इशारा...
गरोदर महिलांनी (प्रेग्नन्ट वूमन) आणि स्तनपान करणाऱ्या मातांनी कडुनिंबाची पाने खाणे शक्यतो टाळावे. याच्या उष्णतेमुळे गर्भाला त्रास होऊ शकतो. (अंघोळीसाठी पाण्याचा वापर मात्र त्या करू शकतात.)

३. शुगर खूपच कमी असल्यास (लो ब्लड शुगर) कडुनिंब रक्तातील साखर वेगाने कमी करतो. त्यामुळे ज्यांची शुगर आधीच लो असते, त्यांनी पानांचे थेट सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**माझे माहेर पंढरपूर**

माझे माहेर पंढरपूर
आहे तिथे उभी
विठू माऊली छान
भजन,किर्तनात माझे
मन खरे रमता
हरीचे गाते गुणगान

चंद्रभागा तिरी आहे
माझे माहेर पंढरपूर
माऊली खरी भक्तांची
जावे वाटे सदा
तिला पाहण्या तेथे
वर्षा जीवनी आनंदाची

# केशव माधव विश्वस्त निधीतर्फे गुणवंत विद्यार्थांचा शैक्षणिक साहित्य,रोख बक्षिसे,प्रमाणपत्र व पुस्तके देऊन गुणगौरव

**सत्कारार्थी विद्यार्थांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य, ''विद्यार्थी दशेत मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी झपाटून परिश्रम करावे'', भौतिकशास्त्र विषयाचे अध्यापक हरिभाऊ गोखले ह्यांचा गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कार प्रसंगी सल्ला.**

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या ४० गुणवंत विद्यार्थांचा सत्कार, गुणगौरव व रोख बक्षिसे वितरण कार्यक्रम ''केशव माधव विश्वस्त निधी'' तर्फे एरंडवणे येथील छत्रे सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगर संघचालक व ''ज्ञानदा प्रतिष्ठान''चे अध्यक्ष उदयन पाठक हे होते.ह्याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या छत्रपती संभाजी भागाचे भागसंघचालक अनिल व्यास यांची मुख्य उपस्थिती होती.

''समाजात आर्थिक मदत करण्याची भावना असणारे अनेक हात आहेत पण ही मदत योग्य व गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असते. विद्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शैक्षणिक क्षेत्रातील ''केशव माधव विश्वस्त निधी'' ही संस्था गेले अनेक वर्षे सामाजिक बांधिलकीच्या भावनेने हे प्रशंसनीय कार्य करीत आहे. विद्यार्थांनी आपले शालेय जीवनात उच्च ध्येय अंगी बाळगावे त्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची आवश्यकता असल्याचे पदार्थविज्ञान चे अभ्यासक व मार्गदर्शक हरिभाऊ धोंडो गोखले यांनी प्रतिपादन केले. केशव माधव विश्वस्त निधीद्वारा आयोजित यंदाच्या शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थांच्या सत्कार प्रसंगी बोलत होते ते पुढे म्हणाले की ''विद्यार्थादशेत मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण



करण्यासाठी झपाटून परिश्रम करावे, अपयशाला घाबरून जाऊ नये, शिक्षणाच्या जोरावर स्वतःबरोबर समाजाचे भविष्य घडवावे. आपल्या आईवडिलांना अभिमान वाटेल असे आपल्या जीवनात कार्य करावे. उत्तम आरोग्या बरोबर विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास करून ज्ञान मिळवावे. शैक्षणिक वारसा नसतांना,आर्थिक पाठबळ नसतांनाही शालांत परीक्षेत तुम्ही एवढे यश मिळविले त्यामुळे तुम्ही सर्व अभिनंदनास पात्र आहात''

अध्यक्षीय भाषणात उदयन पाठक म्हणाले, ''विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबर चांगले संस्कार झाले पाहिजे, उत्तम नागरिक झाले पाहिजे, नैतिक मूल्ये, शिस्त, आई वडिलांप्रती आदर,सामाजिक जबाबदारी आणि आपल्या जीवनात चांगल्या सवयी विकसित केल्या पाहिजे''

कार्यक्रमाच्या सुरवातीस प्रमुख पाहुणे हरिभाऊ गोखले यांचे प्रकाश देशपांडे ह्यांनी, उदयन पाठक यांचे स्वागत कविता शेंडे ह्यांनी तर अनिल व्यास यांचे अरविंद देशपांडे ह्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. केशव माधव संस्थेच्या विविध उपक्रमाविषयी व सेवा कार्याची सचिव अरविंद देशपांडे यांनी माहिती दिली. दरवर्षी दहावी, बारावी मध्ये उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थांचा सत्कार आयोजित करीत असल्याचे यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन प्रशांत कुलकर्णी यांनी केले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र, प्रोत्साहनपर रोख बक्षिसे, शैक्षणिक साहित्य, सेवा सहयोगतर्फे स्कूल किट, प्रवीण दवणे लिखित ''जिद्दीची गुरुकिल्ली''व स्वर्णलता भिशीकर लिखित ''उजळती वाट'' ही प्रेरणादायी पुस्तके देऊन चाळीस विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यात कर्वेनगरातील ज्ञानदा प्रशाला, ग.रा. पालकर, सरस्वती विद्या मंदिर मधील दहावी मध्ये प्रथम दोन आलेले मुले, मुलींचा समावेश आहे.

खुशी लाळे ह्या विद्यार्थिनीने घरच्या अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये बारावी मध्ये ९३ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण होऊन गोखले इन्स्टिट्यूट मध्ये अर्थशास्त्र विषयामध्ये उच्चशिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे त्यासाठी केशव माधव संस्थेने तिला तेथे प्रवेश घेण्यासाठी आर्थिक मदत केली व तिचा विशेष गौरव करण्यात आला.

याप्रसंगी वस्तीतील मुलांना संस्कार वर्ग घेऊन मार्गदर्शन करणारे प्रकाश बापट यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यविकास आधारित पुढील शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध अभ्यासक्रमाची माहिती दिली. तसेच दहावी व बारावीनंतर उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती विषयीची माहिती दिली.

विद्यार्थांच्या वतीने खुशी लाळे, अंजुम सय्यद ह्यांनी मनोगत व्यक्त केले व संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ''केशव माधव''चे अध्यक्ष रवींद्र जावळेकर, सचिव अरविंद देशपांडे, विश्वस्त कविता शेंडे,अमोल जोशी, योगेश देशपांडे, योगेश कुलकर्णी, प्रकाश देशपांडे, संजय वळसंगकर, प्रशांत कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, पालक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ताराचंद रामनाथ शैक्षणिक संकुलात ज्ञानदाची पारंपरिक वारी उत्साहात संपन्न

पुणे **ज्योतिर्मय साहित्य** ज्ञानदा प्रतिष्ठान संचलित ताराचंद रामनाथ शैक्षणिक संकुल, नवसह्याद्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, कर्वेनगर, पुणे येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही ज्ञानदाची वारी मोठ्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

गेली अनेक वर्षे ज्ञानदाची ही पारंपरिक दिंडी प्रशालेपासून कर्वेनगर येथील श्री विठ्ठल मंदिरापर्यंत काढली जाते. या वारीमध्ये बालवाडीपासून इयत्ता दहावीपर्यंतचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्थेचे पदाधिकारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

लेझीम, टाळ, मृदुंग यांच्या निनादात आणि ''विठ्ठल... विठ्ठल...'', ''ज्ञानोबा-तुकाराम'' या जयघोषांनी परिसर भक्तिमय झाला होता. विद्यार्थ्यांनी संतांच्या अभंगांचे गायन करत आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर करत दिंडीला अधिकच आकर्षक स्वरूप प्राप्त करून दिले.

वारीच्या मार्गावर सर्वत्र आकर्षक रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती. कर्वेनगर परिसरातील अनेक ठिकाणी नागरिकांनी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करून पूजन केले. भाविकांनी फुलांची उधळण करत आणि विठ्ठल नामाचा गजर करत वारीचे स्वागत केले.

श्री विठ्ठल मंदिरात पोहोचल्यानंतर अभंग, भजन आणि हरिनाम संकीर्तनाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचा संस्कार अनुभवत भक्ती, शिस्त, समता आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश आत्मसात केला.

ज्ञानदा प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख होण्याबरोबरच अध्यात्म, संस्कार आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करण्याची प्रेरणा मिळाली. उपस्थित पालक व नागरिकांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.या वेळी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री उदयन पाठक,कार्यवाह श्री. मंदार शेंडे, सहकार्यवाह श्री. सुधीर इनामदार, कार्याध्यक्ष श्री. विनायक जोशी कार्यकारिणी सदस्य श्री. दिलीप काळे, सौ. माणिक कुलकर्णी, प्रशालेच्या मुखाध्यापिका सौ.स्वाती कुलकर्णी, ज्येष्ठ शिक्षिका कीर्ती गवळी, सांस्कृतिक प्रमुख सुनीता भोसले हे उपस्थित होते.

# लिनियर गार्डन जेष्ठ नागरिक संघाची आषाढी एकादशी निमित्त दिंडी उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – येथील पिंपळे सौदागरच्या लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार दि. २५ रोजी सकाळी अत्यंत उत्साहात झालेल्या या कार्यक्रमास नगरसेवक बापूसाहेब काटे, नगरसेवक नानासाहेब काटे नगरसेविका अनिताताई काटे यांची उपस्थिती होती. या सर्वांनी भक्तीरसाचा आनंद घेतला.

विठ्ठल रुक्माईचे पूजन अध्यक्ष अशोक वारकर यांचे हस्ते करण्यात आले. सर्व सभासदांनी विठ्ठल रुक्माईची आरती म्हणून भक्ती भावाचा आनंद घेतला. यावेळेस सभासदांनी हातामध्ये भगवे झेंडे घेऊन हरिनामाचा जप करत दिंडीचा आनंद घेतला. या कार्यक्रमात भक्तिमय संगीताचा कार्यक्रम घेण्यात आला त्याचे सूत्रसंचालन रवींद्र संधानशिवे आणि राजेंद्र मांजरेकर यांनी केले. ह्या भक्तिमय संगीत कार्यक्रमात महिलांनी भक्ती गीते सादर केली.




कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पांडुरंग कांबळे, सुरेश बरडे, किशोर देशमुख, विकास अकोले, शरदकांत नेरकर, प्रदीप बादगुडे, दगाजी पाटील ब्राह्मणकर सी व्ही, अश्विनी शेकटकर, छाया वायकर, कीर्तीमाला मोरे, निर्मला महाजन, राजेंद्र महाजन, सुभाष डांगे सुधाकर पाटील यांनी परिश्रम घेतले.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495

## 'सनातन' ...

'सनातन' म्हणजे जो सदैव एकसारखा राहतो, कधीही बदलत नाही. म्हणूनच परमेश्वरालाही 'सनातन' असे म्हणतात. 'सनातन धर्म' म्हणजे असा धर्म किंवा नियम, जो कधीही बदलत नाही, सर्व काळात एकसारखाच राहतो. अथर्ववेदात 'सनातन' शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे–

"सनातनमेनमाहुरताद्य स्यात् पुनर्गवः ।
अहो रात्रे प्रजायते अन्यो अन्यस्य रूपयोः ॥"
(अथर्ववेद १०.८.२३)

सनातन म्हणजे जे कधीही जुने होत नाही, तर प्रत्येक क्षणी नवेपणाने प्रकट होत राहते. जसे दिवस-रात्रीचे चक्र सतत चालू असते, तसेच सनातन तत्त्वही अखंड आणि नित्य असते.

याची काही उदाहरणे पाहूया. जे नियम सर्व काळात, सर्व देशात आणि सर्व परिस्थितीत सारखेच लागू पडतात, ते सनातन नियम आहेत. उदाहरणार्थ, दोन अधिक दोन म्हणजे चार – हा नियम कधीही बदलत नाही. तसेच त्रिकोणाच्या कोणत्याही दोन भुजांची बेरीज तिसऱ्या भुजेपेक्षा मोठी असते किंवा त्रिकोणाच्या तीनही कोनांची बेरीज दोन समकोन (१८० अंश) इतकी असते. हे नियम सर्वकाळ सत्य असल्यामुळे ते सनातन आहेत.

■ धर्म किंवा नियम दोन प्रकारचे असतात – (१) सनातन आणि (२) सामयिक.

- सनातन नियम कधीही बदलत नाहीत; परंतु सामयिक नियम काळ, देश आणि परिस्थितीनुसार बदलतात.

उदाहरणार्थ, हिवाळ्यात उबदार कपडे घालावेत किंवा ताप आल्यास औषध घ्यावे, हे सामयिक नियम आहेत. परंतु शरीर टिकविण्यासाठी अन्न आवश्यक आहे, हा सनातन नियम आहे; कारण कोणत्याही युगात अन्नाशिवाय शरीर टिकू शकत नाही. पण औषध प्रत्येकाला नेहमीच लागते असे नाही; ते आजारपणातच आवश्यक असते. धर्माची दोन रूपे असतात. पहिले म्हणजे त्याची मूलभूत तत्त्वे, जी शाश्वत आणि अपरिवर्तनीय असतात. दुसरे म्हणजे रूढी, परंपरा आणि सामाजिक प्रथा, ज्या देश, काल आणि परिस्थितीनुसार बदलत राहतात. उदाहरणार्थ, कोणत्या वेळी कोणते वस्त्र परिधान करावे, हे प्रथेनुसार ठरते. त्यामुळे अशा गोष्टी धर्माचे मूल तत्त्व नसून सामाजिक रूढी आहेत. अनेक लोक धर्माची मूलभूत तत्त्वे आणि रूढी-परंपरा यांची सरमिसळ करतात. त्यामुळे अनेक गैरसमज निर्माण होतात. (क्रमश):



## वारी संपली... पण प्रवास सुरू झाला

अमोल बोरीकर 86240 03013

आषाढी वारी संपली. दिंड्या आपापल्या गावांकडे परतल्या. टाळ-मृदंगाचा निनाद हळूहळू शांत झाला. भगव्या पताका गुंडाळल्या गेल्या. चंद्रभागेचा किनारा पुन्हा निवांत झाला. पण एक प्रश्न मनाला सतत छळत राहतो–खरंच वारी संपली का? नाही... वारी कधीच संपत नाही.

पंढरपूरहून परतताना वारकरी फक्त आपल्या घरी परतत नाही; तो एक वेगळं मन घेऊन परततो. त्याच्या पायांवर फोड असतात, पण मनात समाधान असतं. डोळे ओले असतात, पण हृदय आनंदाने भरलेलं असतं. कारण त्याने विठ्ठलाचं दर्शन घेतलेलं नसतं; त्याने स्वतःला नव्याने शोधलेलं असतं.

वारी म्हणजे केवळ पंढरपूरपर्यंत चालत जाणे नव्हे, ती तर मानवी मनाची शुद्धीकरणाची प्रक्रिया आहे. वाटेत भेटलेले ऊन, पाऊस, पायातले फोड, अन्नाची भ्रांत या सगळ्यावर मात करत जेव्हा वारकरी विठ्ठलाच्या चरणी लीन होतो, तेव्हा त्याचा अहंकार गळून पडतो. तिथे कोणी श्रीमंत नसतो, कोणी गरीब नसतो; असतो तो फक्त आणि फक्त 'विठ्ठल'. वारीत शिकायला मिळालेली हीच समता, हीच सेवावृत्ती आणि हाच सोशिकपणा आता आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनात उतरायचा आहे. म्हणूनच, पंढरीची वारी संपली असली, तरी 'संसाराच्या वारीचा' एक नवा प्रवास आता सुरू होतोय.

"माझे माहेर पंढरपूर। सुंदर ते जगी परियेसा।।"

संतांनी पंढरीला माहेर मानलं, कारण तिथे मायेची पाखर मिळते. आता त्या माहेरून परत आल्यावर, तिथली ऊर्जा घेऊन आपल्याला आपल्या कर्माची वारी प्रामाणिकपणे करायची आहे.

विठ्ठलाच्या चरणी माथा टेकताना त्याने काही मागितलेलं नसतं. उलट त्याने अहंकार तिथेच ठेवलेला असतो. राग तिथेच विसरलेला असतो मत्सर तिथेच वाहून दिलेला असतो. आणि हातात घेऊन आलेला असतो–प्रेम, समता, सेवा आणि माणुसकीचा प्रसाद.

खरी परीक्षा तेव्हा सुरू होते... जेव्हा दिंडी नसते... अभंगांचा गजर नसतो... भोवती "माऊली" म्हणणारे हजारो वारकरी नसतात...

तेव्हा आपल्या घरात, आपल्या कामाच्या ठिकाणी, आपल्या नात्यांत आपण वारी जिवंत ठेवतो का? आई-वडिलांशी प्रेमाने बोलतो का? रुसलेल्या माणसाला जवळ घेतो का? दुःखी डोळ्यांतील अश्रू पुसतो का? अनोळखी माणसालाही "आपला" मानतो का?

जर या प्रश्नांची उत्तरं "होय" असतील, तर समजा वारी अजूनही सुरू आहे.

संत तुकाराम आणि ज्ञानेश्वर यांनी वारी पंढरपूरपुरती मर्यादित ठेवली नव्हती; त्यांनी ती जीवनपद्धती बनवली. कारण त्यांच्या दृष्टीने विठ्ठल मंदिरात नसून प्रत्येक माणसात होता.

म्हणूनच वारी संपल्यानंतर विठ्ठलाला पंढरपूरात सोडून येऊ नका. त्याला आपल्या घरात आणा. आपल्या बोलण्यात आणा. आपल्या वागण्यात आणा. आपल्या मुलांच्या संस्कारांत आणा. कारण विठ्ठलाला सर्वात प्रिय मंदिर दगडाचं नसतं–ते प्रेमाने भरलेलं हृदय असतं.

वारीचा शेवट पंढरपूरात होत नाही... तो प्रत्येक दिवसाच्या नव्या सुरुवातीत होतो. ज्या दिवशी आपण प्रत्येक माणसात विठ्ठल पाहू, प्रत्येक सेवेत पूजा पाहू आणि प्रत्येक नात्यात "माऊली" अनुभवू, त्या दिवशी आपल्या जीवनातील खरी वारी सुरू झालेली असेल.

पाय पंढरीहून परतले... पण मन अजूनही त्या विटेवर उभ्या सावळ्या विठ्ठलाजवळच आहे. आणि कदाचित... हीच वारीची सर्वात मोठी कमाई आहे.

॥ रामकृष्ण हरी ॥



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आजोबा' (सुरकुत्यांमधील शहाणपण)

मागील अंकावरून पुढे....

माझी मुलगी लहान असताना जेव्हा घरात 'गुलाबाई' बसवायची, तेव्हा तिचे लाड पुरवण्यासाठी आजोबा बाजारातून कौतुकाने वेगवेगळ्या प्रकारचा खाऊ घेऊन यायचे. आजोबा म्हणून लाभलेले त्यांचे ते भरभरून प्रेम आणि मायेची ऊब माझी मुलं आजही विसरू शकत नाहीत. आजोबा असण्याचं आणि नातवंडं खेळवण्याचं हे कौतुक प्रत्येक घराचे भाग्य वाढवत असतं. आई-वडिलांचा ओरडा खाणाऱ्या, अभ्यास न केल्यामुळे किंवा हट्ट केल्यामुळे शिक्षा भोगणाऱ्या नातवंडांना हक्काची पाठराखण आणि संरक्षणाची भक्कम ढाल मिळते ती फक्त आजोबांच्यामुळेच!

जेव्हा आई-बाबा मुलांवर रागावतात, तेव्हा आजोबा ढाल बनून मध्ये उभे राहतात. ते केवळ नातवंडांचे लाड करत नाहीत, तर वेळप्रसंगी मुलांची (आई-बाबांची) सुद्धा प्रेमळ शब्दांत कानउघाडणी करतात. "आम्ही तुम्हाला यापेक्षा जास्त मारलं असतं तर तुम्ही आज इथे नसता, मुलांना प्रेमाने शिकवा," हा त्यांचा हक्काचा सल्ला घरातील वातावरण पुन्हा आनंदी करून जातो. घराचे, नात्यांचे आणि अगदी वास्तूचे जे सूक्ष्म कोने-कोपरे आई-बाबांना समजत नाहीत, ते आजोबांच्या एका शब्दाने उलगडतात. (क्रमशः)

# दवाखाना

## कॉलरा (१)

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो,

महामारी अर्थात कॉलरा म्हटले की कांही शतकांपूर्वी माणसाचे हातपायच गळायचे मानसिकरित्या आणि शारीरिक रित्यादेखील. 'आता होता अन लगेच होत्याचा नव्हता झाला' असे शब्द घराघरातून ऐकायला यायचे. कधी कधी तर हे बोलायला देखील घरात कोणी शिल्लक नसायचे. गावागावात मरीआई नामक देवीचा भीषण प्रकोप म्हणून कॉलरा प्रसिद्ध झाला. तिचा कोप म्हणजे तिच्या पायी रुजू होत तिची परोपरीने आळवणी करायची हा निर्वाणीचा एकच उपाय असे. पण तिचा कोप शांत व्हायला खूप वर्षे जावी लागली. पटकी () या शब्दाचा उगम पटकन किंवा पडणे किंवा पटकना या मराठी / हिंदी क्रियेवरून झाला असावा. या आजारात अतिसार आणि उलट्यांचा त्रास इतक्या अचानक आणि वेगाने होतो की, रुग्ण अगदी पटकन (जागीच) कोसळतो. या साथीत माणसे अक्षरशः किड्या मुंग्यांसारखी दगावत असत, त्यामुळे त्याला महामारी हे नाव पडले. कॉलरा (पटकी / महामारी / जरीमरी / विषूचिका) हा एक तीव्र संसर्गजन्य जिवाणूजन्य रोग आहे. व्हिब्रिओ कॉलरी या स्वल्पविराम चिन्हासारखा आकार असलेल्या ग्रॅम-निगेटिव्ह जिवाणूंच्या संसर्गाने कॉलऱ्याची लागण होते. हा संसर्ग आणि प्रसार मुख्यत्वे दूषित पाणी अथवा अन्न ग्रहण केल्याने होतो. यामुळे पोटात तीव्र जळजळ होऊन रुग्णाला भाताच्या पेजेसारखे पातळ जुलाब आणि उलट्या होतात आणि शरीरातील पाणी वेगाने कमी होते.

मंडळी, 'कॉलरा' या शब्दाचे मूळ कदाचित भारतीय असावे. ग्रीक भाषेमध्ये 'कॉलरा' या शब्दाचा अर्थ 'पित्त' असा होतो. याचे उगमस्थान भारतीय उपखंडात होते.




प्राचीन काळात गंगा नदीच्या खोऱ्यामध्ये हा रोग पसरल्याच्या निश्चित ऐतिहासिक नोंदी आहेत. कॉलराशी मिळत्याजुळत्या अशा तीव्र, पाण्यासारख्या अतिसाराचे वर्णन इसवी सन पूर्व ५ व्या शतकातील सुश्रुत संहितेत आढळून आले आहे. तसेच प्राचीन चीनमधील हान राजवंशाच्या काळात हे वर्णन दिसून आले आहे. आवागमनाची विशेष साधने नसल्याने हा रोग अनेक शतके प्रामुख्याने भारतातील गंगा नदीच्या खालच्या प्रदेशापुरताच सीमित होता. मात्र तो जगातील इतरत्र स्थानी पोहोचण्याचे कारण व्यापारी आदानप्रदान होते. बंगालच्या गंगेच्या खोऱ्यापासून हा रोग व्यापारी मार्ग आणि मानवी स्थलांतराद्वारे जगभर पसरला. जमिनीवरून प्रारंभ करीत जलमार्गाच्या द्वारे या रोगाचा सर्वदूर संचार सुरु झाला.

याचा परिणाम असा झाला की जगात गेल्या दोनशे वर्षांमध्ये सात वेळा कॉलऱ्याची भयानक साथ आल्याचे नमूद करण्यात आले आहे. पहिल्या सहा जागतिक महामारी १८१७ ते १९२३, या काळात झाल्या. याचे कारण म्हणजे हा रोग अत्यंत वेगाने आशिया, मध्य पूर्व, युरोप आणि अमेरिका खंडात पसरला आणि त्याने लाखों लोकांचा घास घेतला. १८१७ साली रशियात व रशियामधून युरोपमार्गे उत्तर अमेरिकेमध्ये त्याचा विस्तार झाला. सातवी जागतिक महामारी (१९६१ आजपर्यंत) इंडोनेशियात व्हिब्रिओ कॉलरीच्या विशिष्ट प्रजातींमुळे सुरु झाली. ती १९७० च्या दशकात आफ्रिकेत गेली. त्यानंतर १९९१ मध्ये पेरूमध्ये याचा भयंकर उद्रेक होऊन ती अमेरिकेत पोहोचली. याचे संभावित कारण अर्थातच दूषित पिण्याचे पाणी व स्वच्छतेचा अभाव होते. प्रामुख्याने ज्या भागांत ही समस्या होती तिथे हा रोग स्थानिक पातळीवर प्रसारित होतच होता. २०१० मध्ये जगभरात ३०५० लाख लोकांना हा रोग झाला आणि त्यात १ ते १.३ लाख लोक दगावले गेले असावेत, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला महामारीशास्त्रातील (एपिडेमिओलॉजी) एक महत्त्वपूर्ण शोध:

मियास्मा सिद्धांत

हा एक कालबाह्य वैद्यकीय सिद्धांत आहे. त्यानुसार कॉलरा, प्लेग आणि मलेरियासारखे रोग हे कुजणाऱ्या सेंद्रिय पदार्थांमधून आणि साचलेल्या पाण्यातून बाहेर पडणाऱ्या दूषित हवेमुळे अथवा विषारी वाफेमुळे होतात. १९व्या शतकापर्यंत, वैद्यकीय तज्ज्ञांचे ठाम मत होते की कॉलराचे मूळ मियास्मा आहे. मात्र ब्रिटिश चिकित्सक जॉन स्नो (१५ मार्च १८१३ – १६ जून १८५८) यांनी १८५४ साली लंडनच्या सोहो जिल्ह्यातील एका गंभीर साथीच्या रोगाची विस्तृत आणि सखोल तपासणी केली असता हे मत बदलले. अतिशय अभ्यासू वृत्तीच्या स्नो यांनी या आजाराचा नकाशा तयार केला आणि शोधून काढले की या रोगाचा संसर्ग ब्रॉड स्ट्रीट येथील पाण्याच्या पंपाच्या आसपास केंद्रित झाला होता. आश्चर्य म्हणजे स्थानिक अधिकाऱ्यांना पंपाचे हँडल काढण्यास राजी करून, त्यांनी या साथीला थांबवले. बघा मंडळी, यात वित्त आणि आधुनिक संसाधने नव्हती, तर होते एक अनवट आणि अचूक असे निरीक्षण! मानवजातीवर पराकोटीचे उपकार करणाऱ्या या चिकित्सकाला लवून मुजरा! स्नो यांनी या मियास्मा सिद्धांताला आव्हान देत असा दावा केला की, कॉलरा हा एक संसर्गजन्य रोग असून तो तोंडावाटे शरीरात प्रवेश करतो आणि दूषित पाण्याद्वारे पसरतो. कॉलरा हा पाण्याद्वारे पसरणारा आजार आहे हे सिद्ध करणारे पुरोगामी चिकित्सक जॉन स्नो आधुनिक साथरोगशास्त्राचे जनक म्हणून ओळखले गेले. विविध प्रकारांच्या भूल देणाऱ्या वायूंचा सतत अभ्यास करणाऱ्या स्नो यांचे बहुदा याच वायूंच्या प्रतिकूल परिणामांमुळे वयाच्या केवळ ४५ व्या वर्षी दुर्दैवी निधन झाले. त्याच वर्षी (१८५४), इटालियन शरीरशास्त्रज्ञ फिलिपो पाचिनी यांनी या रोगास कारणीभूत ठरणारा स्वल्पविरामाच्या आकाराचा जिवाणू सर्वप्रथम वेगळा केला.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

तथापि, १८८३ मध्ये जर्मन जीवाणुशास्त्रज्ञ रॉबर्ट कॉक यांनी स्वतंत्रपणे व्हिब्रिओ कॉलरीची ओळख पटवून त्याचे संवर्धन करेपर्यंत फिलिपो यांच्या मूळ शोधाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते.

# कर्ड पाम्लेट

ज्योतिर्मय साहित्य



काय? नाव वाचून उत्सुकता वाटतेय ना,कसा असेल हा पदार्थ? स्नॅक्सचा की जेवणात असेल हा, गोड की तिखट असेल? बनवायला वेळ खाऊ ,किचकट

की झटपट बनणारा असेल? स्टार्टर की डिझार्ट असेल.. कित्येकाना तरी हा नक्की व्हेजिटेरियन पदार्थच असेल ना? अशी शंका सुद्धा आली असेल,हो ना?

मग आता जास्त डोक्याला ताण न देता सरळ पहाच ना बनवून! त्यासाठी साहित्य

तर सगळे घरात असतेच फक्त ब्रेड मात्र आणावा लागेल ,तो सुद्धा घरात असेल तर सुरु करा लगेंच बनवायला..

साहित्य:

आठ ब्रेडचे स्लाईस,..ते सँडविच ब्रेडचे किंवा कोणत्याही आकारातील,आवडत्या

प्रकारचे असले तरी चालतील फक्त बॅटर त्यानुसार थोडेसे कमी जास्त बनवावे , एक वाटी गोड दही, अर्धी वाटी बेसन, एक चमचा बारीक रवा, तीन,चार मिरच्यांचे एकदम बारीक कट केलेले तुकडे, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, पाव वाटी एकदम बारीक चिरलेली कांद्याची पात असल्यास उत्तम, ५..६ लसूण पाकळ्या व अर्धा इंच आले यांचे एकदम बारीक कट केलेले तुकडे,थोडे काळे तीळ, पाव चमचा ओवा, पाव चमचा जिरे, पाव चमचा हिंग, पाव चमचा हळद, मिठ व किंचित साखर चवीनुसार, अर्धा चमचा खाण्याचा सोडा, तेल किंवा बटर.




कृती: प्रथम ब्रेडच्या कडा काढून घ्याव्यात. मग बॅटर बनवायला घ्यावे. त्यासाठी एका बाऊल मध्ये दही घेऊन त्यात चवीसाठी किंचीत साखर घालावी.आता त्यात बेसन व रवा घालून व्हिस्करने छान फेटावे. हळूहळू पाणी घालत भज्याच्या बॅटर प्रमाणे थोडेसे सैलसर बनवावे. नंतर त्यात आले, लसूण, मिरच्यांचे तुकडे, कोथिंबीर, कांदापात, हिंग, हळद, ओवा, जिरे, काळेतीळ घालून चवीनुसार मीठ घालावे व बॅटर पुन्हा छान फ ेटावे.

आता गॅसवर एक शक्यतो नॉनस्टिक तवा गरम करण्यास ठेवावा. शेवटी बॅटर मध्ये

सोडा किंवा इनो घालून मस्त फुगून हलकेपणा येईपर्यंत गोलाकार फेटावे. आता तवा गरम झाला असेल. तो मध्यम आचेवर ठेवून त्यावर शक्यतो बटर लावावे

नसल्यास तेल पण चालते. नंतर बॅटरमध्ये

ब्रेडचा स्लाईस व्यवस्थित बुडवुन तो तव्या

वर शालोफ्राय करण्यास ठेवावा. तवा मोठा असेल तर एकाचवेळी चार स्लाईस

पण ठेवता येतात. मग बटर सोडत दोन्ही बाजू खरपूस भाजून घ्याव्यात. आणिआपला सुंदर गोल्डन कलरचा तयार पाम्लेट टोमॅटो केचप किंवा चटणीसोबत गरमगरम खाण्यास द्यावा.

वैशिष्ट्य: ही डिश ब्रेकफास्ट साठी, मधल्या वेळच्या भुकेसाठी किंवा अगदी लाईट आणि चेंज म्हणून डिनरला सुद्धा बनवू शकतो. मित्र,मैत्रिणींच्या छोट्या पार्टीसाठी ही चटपटीत डिश ठेवली तर सगळेजण नक्कीच तुटून पडतील यात शंकाच नाही. हे बनवायला झटपट,दिसायला आकर्षक, खायला चटपटीत व इतके टेस्टी बनतात

की मुलांपासून ते आजीआजोबांपर्यन्त

सगळ्यांनाच मनापासून आवडेल.

ब्रेडचे पकोडे बऱ्याच लोकांना आवडतात,


पण ते तळलेले असल्यामुळे खूपच तेलकट बनताता. त्याच्या ऐवजी हा ऑप्शन खूपच आवडेल सर्वांना!

आवडत असतील तर ब्रेडच्या कडा सुद्धा काढल्या नाहीत तरी चालतात.

डाळीच्या पिठामुळे जरी थोडेसे वातुळ होईल असे वाटत असले तरी त्यात हिंग, ओवा, आलं लसूण यासारखे घटक पदार्थ सुद्धा असल्यामुळे त्रास होत नाही. सोड्यामुळे छान फुगून हलकेपणा येतो. तर रव्यामुळे मस्त टेक्स्चर येते. दह्यामुळे तर याची लज्जत काही न्यारीच लागते. दही आणि बटर यांच्या कॉम्बिनेशनमुळे तर पनीरसारखा फील येतो. कलोंजी किंवा काळे तीळ बॅटरमध्ये घालण्यापेक्षा भाजताना वरून भुरभूरले तरी छान दिसतात. काय,आवडली ना रेसिपी? मग बनवा लगेंच ..


# कवितेच्या लाटावर...

कवितेच्या लाटावर...
























हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# विठ्ठल नामाच्या गजरात दुमदुमले प्रतिपंढरपूर...

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त प्रति पंढरपुरातील विठ्ठल मंदिरात आज पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. यावेळी विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल या अखंड नामघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला असून संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.

पहाटेच्या काकड आरतीनंतर मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले करण्यात आले. त्यानंतर दर्शनासाठी महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह हजारो भाविकांनी शिस्तबद्ध रांगा लावल्या. विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत भाविकांनी सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. यावेळी विविध भागांतून आलेल्या वारकरी दिंड्यांनी मंदिरात प्रवेश करत टाळ-मृदुंगाच्या गजरात अभंग आणि हरिपाठ सादर केला. वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेने आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजराने परिसराला पंढरपूरच्या वारीचे स्वरूप प्राप्त झाले. जय हरी विठ्ठलच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. दिवसभर मंदिरात भाविकांची वर्दळ कायम राहिली. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांमुळे मंदिर परिसर फुलून गेला. भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनोखा संगम अनुभवण्यासाठी आलेल्या भाविकांनी आषाढी एकादशीचा हा सोहळा अविस्मरणीय ठरला, अशा भावना व्यक्त केल्या. मध्यरात्री उद्योगमंत्री उदय सामंत, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, खा. संदिपान भुमरे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी मंदिराचे अध्यक्ष राजेंद्र पवार, सचिव आप्पासाहेब झळके, विश्वस्त रत्नाकर शिंदे, हरीश साबळे, कृष्णा झळके, हरिभाऊ शेळके, बंकटलाल जैस्वाल, काकापाटील फांदाडे यांच्यासह आदींनी सहकार्य केले.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने दर्शनासाठी विशेष नियोजन केले होते. दर्शन रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय मदत तसेच स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. गर्दीचे प्रभावी नियोजन करण्यासाठी मंदिर परिसरात ६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते.

या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण परिसरावर सतत नजर ठेवण्यात आली. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस प्रशासनानेही विशेष बंदोबस्त ठेवला होता. वाहतूक नियंत्रण, दर्शन रांगांचे नियोजन करण्यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले. भाविकांनीही प्रशासनाला सहकार्य करत शांततेत दर्शनाचा लाभ घेतला.

आषाढी एकादशीनिमित्त शहरातही विठ्ठल भक्तीचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला. शहरातील विविध विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये पहाटेपासून काकड आरती, हरिपाठ, भजन, कीर्तन, नामस्मरण आणि महापूजा अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध सामाजिक संस्था, मंडळे आणि सेवाभावी संघटनांनी सामाजिक बांधिलकी जपत भाविकांसाठी फराळ व पाणी वाटप केले. आकाशवाणी रोड परिसरात विविध संघटनांच्या वतीने साबुदाणा खिचडी, पिण्याचे पाणी तसेच फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी कै. रावसाहेब धोंडिबा अधाने यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन क्विंटल खिचडी, राजगिरा लाडू, केळी, पाणी वाटप केले. यावेळी भास्करराव अधाने यांनी सहकार्य केले. त्याचबरोबर आषाढी एकादशीच्या निमित्ताने अपना बाजार मित्र मंडळाच्या वतीने देखील खिचडी, राजगिरा लाडू, केळी वाटप केली.



यावेळी सुनिल खेडकर, मनोज गुजराती, अमित खाबिया, नितेश राका, प्रवीण घुले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.राका, प्रवीण घुले यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



# राजीव गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वच्छता अभियान उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. या अभियानात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदानातून स्वच्छतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वच्छता करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी झाडू, टिकाव, फावडे आदी साहित्य हातात घेऊन परिसर स्वच्छ केला. श्रमदानातून स्वच्छ परिसर, निरोगी समाज आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा संदेश देत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याने समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट, श्रमसंस्कार आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सह कार्यक्रम अधिकारी डॉ. कालिदास दिनकर फड यांनी स्वच्छता ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले.

या उपक्रमात डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. मनोज देवकर, डॉ. नानासाहेब लावंड, प्रा. प्रशांत माठे, डॉ. इम्रान पठाण, प्रा. लक्ष्मण खरात, प्रा. अर्जुन चव्हाण, प्रा. शिंदे, प्रा. कोठाळे, डॉ. ललित गोल्डे, ज्ञानेश्वर जाधव, मधुकर राठोड तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभियानाच्या शेवटी उपस्थितांनी महाविद्यालय परिसर कायम स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची प्रतिष्ठा, स्वच्छतेची सवय आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक दृढ झाली.

# मनपा शाळा एन-सेवन सिडको शाळेत आषाढी एकादशी सण उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत आषाढी एकादशी सण साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणीची वेशभूषा परिधान केली होती. बाल वारकऱ्यांची पाचशे मीटर पायी दिंडी काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री मनोज अग्रवाल यांनी केले. शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी भक्ती गीतावर समुह नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी भक्ती गीत गायन केले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी फुगड्या खेळल्या. शिक्षकांनी भक्ती गीत गायन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आदरणीय श्रीमती वैशाली सुरडकर मॅडम यांनी केले.



कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक शिक्षिका सौ. संगीता अंबेकर, श्रीमती सुनीता पाटील, श्रीमती वैशाली सुरडकर, श्रीमती मंगला महाजन, श्रीमती अंजली कुलकर्णी, श्रीमती स्वाती घोडतुरे, श्रीमती दीपाली औटे, श्रीमती शिल्पा बहुरे, श्रीमती वैशाली देशमुख, मा. श्रीमती मंजुश्री राठोड, श्री. वेंकट जाधव, श्रीमती शुभांगी चव्हाण, श्री. दीपक पडोळ श्री. संदिप कळंबे, श्री. सागर मगरे, श्री.ज्ञानेश्वर असोलकर, श्रीमती पल्लवी क्षीरसागर, श्री. प्रितीश सराटे, श्री. सुशील दांडगे, श्रीमती फिरदोस नदाफ,. श्रीमती सबासदफ सिद्दीकी, श्रीमती पल्लवी क्षीरसागर. श्रीमती बोरसे, श्रीमती सदावर्ते, श्रीमती अंकिता बोचरे, श्रीमती आश्विनी घोडके श्री. निशांत जडे या सर्व शिक्षक शिक्षिकांनी आणि श्री. रमेश देवडे, श्री. विजय गायकवाड, श्री अविनाश भोंबे या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

# श्री सरस्वती भुवन प्रशालेत आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरणात कार्यक्रम संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - श्री सरस्वती भुवन प्रशालेत आषाढी एकादशीनिमित्त अत्यंत भक्तिमय वातावरणात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी अभंग, भजन, नामस्मरण तसेच विठ्ठल-रुक्मिणी वेशभूषेद्वारे वारकरी परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. संपूर्ण विद्यालय परिसर ''विठ्ठल... विठ्ठल...'' या नामघोषाने दुमदुमून गेला.

या प्रसंगी संगीत शिक्षिका माया मुळे यांनी विठ्ठलभक्तीपर गीते सादर करून कार्यक्रमात भक्तिरसाची अनुभूती निर्माण केली. मुख्याध्यापक श्री विश्वरूप निकुंभ व पर्यवेक्षक श्री विजय चापाईतकर यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम संपन्न झाला. सांस्कृतिक विभाग प्रमुख सीमा मुंदडा यांच्या नियोजनातून

शुभांगी पांगरकर, चंद्रमा बानाटे, संध्या चोले, दिपाली सोळंके, स्नेहा सोनेकर तसेच विजय पिंपळे, विजय पाताळयंत्री व सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने कार्यक्रम यशस्वीरीत्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांमधून भारतीय संस्कृती ,वारकरी परंपरा यांची जपणूक व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




# माझ्या आजीची आगळी वेगळी कीर्तनवारी

**ज्योतिर्मय साहित्य**

सर्वसाधारणपणे वारी म्हणजे म्हणजे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची पंढरपूरच्या विठ्ठलाच्या भेटीसाठी केली जाणारी पवित्र, सामुदायिक पायी पदयात्रा आहे. वारी या शब्दाचा मूळ अर्थ येरझार किंवा नियमितपणे फेरी करणे असा होतो आणि नित्यनियमाने ही वारी करणारा तो वारकरी! ऊन, पाऊस आणि वाऱ्याची तमा न बाळगता कसोशीने शेकडो किलोमीटरचा प्रवास पायी पूर्ण करीत हा वारकरी पंढरपुरात विठ्ठलचरणी नतमस्तक होत असतो.

मात्र मी ज्या अनवट वारीविषयी सांगणार आहे, तिचे स्मृतिगंध माझ्या बालपणीच्या रम्य काळाशी जोडलेले आहेत. नागपुरातील शिवाजीनगर (तेव्हाचे धरमपेठ एक्सटेंशन) येथे आमचे वास्तव्य होते. आमची आजी (तिला आम्ही सर्वांनी आईसाहेब म्हणून संबोधायचे असा वडिलांचा दंडकच होता) अत्यंत देवभक्त होती. घरच्या देवपूजेसोबत तिला त्या परिसरातील देवळांच्या वाऱ्या करणे अतिशय प्रिय होते. आषाढ शुद्ध एकादशीपासून (देवशयनी) कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत (प्रबोधिनी) येणारा चार महिन्यांचा परम पवित्र कालावधी अर्थात चातुर्मास तर तिच्यासाठी देवदर्शनाच्या पर्वणीचा कळसाध्यायच असायचा. तेव्हां आमच्या परिसरातील मुरलीधराचे मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर आणि राममंदिर (या शिवाय लहान लहान आणि लोकांच्या घरी वसवलेली मंदिरे वेगळी!) या तिन्ही देखण्या मंदिरांत नामस्मरण,



भागवतसप्ताह आणि कीर्तने होत असत. इथे जाऊ का तिथे जाऊ, अशी आईसाहेबांच्या मनाची घालमेल होत असे.

आईसाहेब निरक्षर होत्या, तरीही देवळांच्या समोर लाकडी फळ्यांवर लिहिलेले सर्व कार्यक्रम त्या कुणाच्या तोंडून वदवून घेत कुणास ठावे? असे झाल्यावर त्या त्या कीर्तनकाराची माहिती लक्षात ठेवत या सकल मंदिरात आळीपाळीने सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशी त्या नित्यनेमाने हजेरी लावीत असत. आजच्या भाषेत सांगायचे तर त्या या ईश्वरनामाच्या कीर्तनरंगाच्या भक्तिसागरात रंगून गेलेल्या टॉप फॅन होत्या.

मंडळी, मी आईसाहेबांची शतशः ऋणी आहे, ती केवळ मी त्यांची सर्वांत लाडकी नात होते म्हणून नव्हे तर, त्यांच्यासोबत मी देखील या त्यांच्या कीर्तनवारीत सामील होत असे म्हणून! पक्क होत चाललेल्या मोतीबिंदूमुळे आईसाहेबांना नीटसे दिसत नसे. त्यांना हात धरून मंदिरांत पोहोचवण्याची आणि निगुतीने घरी अथवा अन्य मंदिरांत घेऊन जाण्याची सर्वाधिक जबाबदारी वडिलांनी त्यांची ज्येष्ठ कन्या म्हणून माझ्याकडे सुपूर्द केली होती. त्यात इवलीशी देखील कसर झालेली



**डॉ. मीना श्रीवास्तव ठाणे.**
**मो. 99201 67211**

वडिलांना चालत नसे. आईसाहेबांना रस्त्याच्या कडेकडेने दगडांच्या ठेचा लागू न देता सावकाश चालवणे म्हणजे माझ्या सहनशक्तीची कमाल असे. त्यांची ने-आण करण्यासाठी दोन चकरा वाया घालवण्यापेक्षा मी अभ्यासाचे एखादे पुस्तक सोबत नेत असे आणि कीर्तन आटपेपर्यंत मंदिराच्या बाहेर बसून अभ्यास करीत असे. मात्र याला एक अपवाद होता. लक्ष्मीनारायण मंदिरात साल्पेकर बुवा नावाचे प्रसिद्ध कीर्तनकार जेव्हां कीर्तन करीत असत, तेंव्हा मी त्यांचे सुश्राव्य कीर्तन कधीच चुकवीत नसे. असे होता होता भागवत, महाभारत आणि रामायणातील कित्येक गोष्टी मी कीर्तने ऐकत शिकले. अध्यात्माचे जटिल ज्ञान सर्वच कीर्तनकार इतक्या सुलभ, चित्तवेधक आणि नाट्यमय रीतीने समजावून सांगत की त्यांच्या या प्रवचन कलेवर सर्व श्रोते मंत्रमुग्ध होत असत.

एकादशी, रामनवमी व कृष्णजन्माष्टमीसारख्या पर्वकाळात दिंड्या निघत. त्यात लोक स्वयंस्फूर्तीने सामील होत असत. मैत्रांनो, या कीर्तनवारीने मला खूप कांही शिकवले. आजही मला रामायण आणि महाभारत हे प्राचीन ग्रंथ सर्वात अधिक प्रभावित करतात. वयाची पंचाहत्तर वर्षे गाठल्यावर आईसाहेब आजारी पडल्या आणि मोक्षदा एकादशीच्या परमपावन दिनी त्या आम्हाला सोडून गेल्या. घरात आर्थिक अडचणी असल्याने त्यांची पंढरपूरला जायची इच्छा अपूर्णच राहिली. नंतर २००४ साली मी पंढरपुरी विठ्ठलाच्या दर्शनाला गेले तेव्हां माझ्या प्रिय आईसाहेबांच्या वतीने मी विठ्ठलाला मनोभावे नमस्कार केला. कारण त्यांनी लौकिकार्थाने वारी केलेली नसली तरी माझ्या पुण्यशील आईसाहेबांनी आपले बहुतांश जीवन कीर्तनवारीद्वारे ईश्वराचे नामस्मरण करण्यात व्यतीत केले असल्याने त्यांना 'वारकरी' ही बिरुदावली मी सन्मानपूर्वक अर्पण करते.

# पालखी दिंडी सोहळा हर्षोल्हासात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

चोंडी - आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चोंडी येथे गावकऱ्यांच्या सहकार्याने पालखी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.




यावेळी विद्यार्थ्यांनी संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या अभंगांचे सादरीकरण करत ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषात दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामस्मरणात संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

दिंडीमध्ये शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. गावातील प्रमुख रस्त्यांवरून दिंडीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संत परंपरा, वारकरी संस्कृती तसेच सामाजिक ऐक्य व सहकार्याचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावकऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. शाळेच्या मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून दिंडीचे सौंदर्य अधिकच खुलवले. काही विद्यार्थ्यांनी सायली प्रतीक यांनी विठ्ठल-रखुमाईच्या वेशभूषेत सहभाग घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच दिंडीदरम्यान ठिकठिकाणी ग्रामस्थांनी पाणी, प्रसाद व फराळाचे वाटप करून वारकऱ्यांचे स्वागत केले.

या कार्याच्या यशस्वीतेसाठी समस्त चोंडी गावातील गावकरी, भजनी मंडळ, वारकरी तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. अर्जुन मुंडे सर, श्री. नारायण रूद्र सर, श्री. रामेश्वर मुंडे सर, श्री. घोळवे सर, श्रीम. गुट्टे यांच्या सहकार्यातून सोहळा फुलला.

शेवटी शाळेच्या प्रांगणात आरती व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. संपूर्ण सोहळा भक्ती, संस्कार आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम ठरला.

चिमुकल्यांचा
दिंडी सोहळा
सोन पाऊली
प्रांगणी गोळा
शाळेचा लळा
लागला बाळा
विद्यार्थी विठू
मुली रुक्मिणी
झाली ही शाळा
पंढरपूर
हर्ष उल्हास दे भरपूर.

# ।। परब्रम्हलिंगं भजे पांडूरंगम् ।।

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदाय हे भक्तिमार्गाचे अतिशय मनोहर स्वरूप आहे. पाण्यात विरघळलेल्या साखरेला पाण्यापासून जसे वेगळे करता येत नाही किंवा समुद्राची लाट जरी लहान असली तरी ती समुद्रापासून वेगळी नाही (ज्ञानेश्वरीअध्याय-१४, ओवी३८६) तद्वतच महारष्ट्राची वारकरी परंपरा व तिच्यातील आषाढी व कार्तीकीची वारी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासापासून वेगळी करता येणार नाही.

सनातन हिंदू धर्मातील प्रकांड पंडित, महान तत्वज्ञ आणि अद्वैत तत्वज्ञानाचे पुरस्कर्ते असणार्या आदि शंकराचार्यांनी अनेक टिकाग्रंथ लिहिलेले असून त्यांनी रचलेली सर्वच स्तोत्रे अत्यंत गेय, रसाळ, प्रासादिक व मधुर आहेत. ती सर्वच स्तोत्रे शब्दालंकार व अर्थालंकारानी ओतप्रोत भरलेली आहेत, त्यातीलच एक आहे ‘पांडूरंगाष्टकं’. हे स्तोत्र सुंदर व चित्ताकर्षक अशा सुप्रसिद्ध भुजंगप्रयात वृतात रचलेले आहे. भुजङ्गप्रयात छन्द हा संस्कृत साहित्यातील अत्यंत प्रसिद्ध, लयबद्ध आणि लोकप्रिय समवृत्त छंद आहे. भक्तीकाव्य, स्तोत्रे आणि स्तुतीपर रचनांमध्ये या छंदाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केल्या जातो.

या स्तोत्राचे महत्त्व केवळ एका भक्तीरचनेपुरते मर्यादित नसून, ते भारतीय संस्कृतीच्या अनेक अंगांशी जोडलेले आहे. स्तोत्राच्या पहिल्या श्लोकात आलेला भीमरथ्या हा शब्द पंढरपूरच्या भौगोलिक वास्तवाशी जोडलेला आहे. पंढरपूर येथे भीमा नदी चंद्रकोरीच्या आकारात वाहते, म्हणून तिला चंद्रभागा असेही म्हणतात. प्राचीन काळापासून हे क्षेत्र वारकरी संप्रदायाचे आणि विष्णू उपासनेचे मुख्य केंद्र राहिले आहे. आद्य शंकराचार्यांनी संपूर्ण भारतात चार मठ स्थापन करण्यासोबतच देश भ्रमण केले होते. त्यांनी भारतातल्या व महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या होत्या. याच प्रवासात ते पंढरपूरला आले आणि तेथील विठ्ठलाच्या लोकोत्तर रूपाने भारावून जावून त्यांनी हे स्तोत्र रचले. पांडुरंगाष्टक स्तोत्र हे भगवान श्री विठ्ठलाच्या लोकोत्तर रूपाचे आणि त्याच्या परब्रह्म स्वरूपाचे दर्शन घडवणारे अत्यंत दिव्य स्तोत्र आहे.

महायोगपीठे तटे भीमरथ्या
वरं पुंडरीकाय दातुं मुनीन्द्रैः।
समागत्य तिष्ठन्तमाद्यं
परं ब्रह्म पांडुरङ्गम भजे ।।१।।

भीमा (चंद्रभागा) नदीच्या तीरावर असलेल्या महायोगपीठाच्या ठिकाणी पुंडलिक भक्ताला वरदान देण्यासाठी श्रेष्ठ ऋषींसह येऊन प्रसिद्ध अशा परब्रह्मस्वरूप पांडुरंगाला मी वंदना करतो.

तडित्सार्ववासा गलं मन्दमालां



लसत्कौस्तुभं भासुरं कुण्डलाभ्याम्।
सुदुर्दर्शमानं मनोज्ञं सुरूपं
परं ब्रह्म पांडुरङ्गम भजे ।।२।।

ज्याने विद्यूलते सारखे प्रकाशमान असे वस्त्र परिधान केलेले आहे, ज्याच्या गळ्यात सुंदर मण्यांची माळ आहे आणि ज्याच्या गळ्यातला कौस्तुभहार सुशोभित करत आहे, ज्याचे कर्ण कुंडलांनी शोभून दिसत आहेत, ज्याचे दर्शन अतिदुर्लभ आहे आणि जो अत्यंत मनमोहक व सुंदर रूपाचा आहे, अशा परब्रह्मस्वरूप पांडुरंगाला मी नमन करतो.

प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां
नितंबः कराभ्यां धृतो येन तस्मात् ।
विधातुर्वसत्यै धृतो नाभिकोशः
परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगं ।।३।।

भक्तांसाठी हा मायारूपी सागर किती खोल आहे हे दर्शविण्याकरीता कंबरेवर हात ठेवलेल्या, ब्रह्मदेवाचा निवास असलेला नाभीकोशा (नाभीकमल) समीप हात ठेवलेल्या परब्रह्मस्वरूपी पांडुरंगाला मी नमस्कार करतो.




स्फुरत्कौस्तुभालंकृतं कंठदेशे
श्रिया जुष्टकेयूरकं श्रीनिवासम् ।
शिवं शान्तमीड्यं वरं लोकपालं
परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगं ।।४।।

गळ्यातील कौस्तुभ मण्याचा प्रकाश ज्याच्या शरीरावर विखुरलेला आहे आणि ज्याच्या हातातील कंकण लक्ष्मीला सुद्धा आवडते, जो स्वतः लक्ष्मीचे निवासस्थान असून कल्याणकारी, शांत, श्रेष्ठ व लोकांचा पालन करणारा आहे अशा परब्रह्मस्वरूपी पांडुरंगाचे पूजन करतो.

शरच्चंद्रबिंबाननं चारुहासं
लसत्कुंडलक्रान्तगंडस्थलांगम् ।
जपारागबिंबाधरं कंजनेत्रं
परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगं ।।५।।

शरदातील पूर्ण चंद्रासदृश ज्याच्या चेहऱ्यावर सुंदर हास्य विलसत आहे, कानातील आभूषणांची आभा ज्याच्या चेहर्यावर पसरली आहे, जास्वंदीच्या फ ुलाप्रमाणे ज्याचे ओष्ठदल रक्तवर्ण असून ज्याचे नेत्र कमळाप्रमाणे आहेत, अशा परब्रह्मस्वरूपी पांडुरंगाला मी नमन करतो.

किरीटोज्ज्वलत्सर्वदिक् प्रान्तभागं
सुरैरर्चितं दिव्यरत्नैरमघ्यैः ।
त्रिभंगाकृतिं बर्हमाल्यावतंसं
परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगं ।।६।।

ज्याच्या शिरोभागी असणार्या मुकुटाच्या तेजाने दशोदिशा उजळून निघाल्या आहेत, स्वर्गीय बहुमूल्य रत्नांनी देवांनी ज्याचे पूजन केलेले आहे आई तीन ठिकाणी वाकलेला बाळकृष्ण इथे मात्र पांडूरंग स्वरूपात उभा आहे त्याला मी वंदन करतो.

विभुं वेणुनादं चरन्तं दुरन्तं
स्वयं लीलया गोपवेषं दधानम् ।
गवां वृंदकानन्दनं चारुहासं
परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगं ।।७।।

ज्याच्या मुरलीचा मंजुळ ध्वनी चहूबाजुला सर्वत्र पसरलेला आहे, आपली लीला दाखवण्यासाठी जो गोपालाचा वेष धरण करून जो गायींना आनंदीत करतो अशा परब्रह्मस्वरूपी पांडुरंगाला मी नमस्कार करतो.

अजं रुक्मिणीप्राणसंजीवनं तं
परं धाम कैवल्यमेकं तुरीयम् ।
प्रसन्नं प्रपन्नार्तिहं देवदेवं
परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगं ।।८।।

ज्याला आदि नाही व अंतही नाही व जो रुख्मिणीच्या जीवनाचा आधार आहे, जो भक्तांच्या विश्रामाचे स्थान आहे, ज्याचे परमधाम केवळ कैवल्य असून जे तुरीय अवस्थेच्या पलीकडे आहे, अशा परब्रह्मस्वरूपी पांडुरंगाला मी नमस्कार करतो.

आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी असे सुद्धा म्हणतात. जगातील भक्तिमार्गाचे अनुयायी असणार्या व त्यातही वारकरी म्हणजे ज्यांच्या गळ्यात तुळशीचि माळ असून जे वर्षानुवर्ष सातत्याने पंढरीची वारी करतात त्यांचा हा खरे तर आनंदोत्सवच असतो. ह्या मंगलदिनी त्या पांडूरंगाला विनम्रपणे वंदन करू या.

# “पंढरीची वारी“ पारंपरिक स्वरुपात

**ज्योतिर्मय साहित्य**

मागील अंकावरून पुढे......


दरवर्षी आषाढी एकादशीला पाच ते दहा लाख लोक विठ्ठल देवाचे दर्शन घेतात. याबाबतीतील मुख्य मुद्दा हा आहे की, या वारकऱ्यांची जशी पंढरीची वारी असते तशी ते व्यवस्थित पार पाडतात. परंतु, वर वर्णन केल्याप्रमाणे इतर जे शासकीय घटक वारक-यांच्या सेवेसाठी वारीसोबत सामील झालेले असतात. त्यांच्या सेवेची वारीही त्यांनी अंतर्यामीच्या सेवाभावाच्या दृष्टीने, म्हणजेच निर्मळ मनाने आणि निष्पक्ष कर्तव्य भावनेने ही सेवा पार पाडली पाहिजे. १.पोलिस खात्यातील पोलीस , इन्स्पेक्टर यांनी वारक-याच्या सामान वाहतुकीची वाहने ट्रक,टेंपो इत्यादी त्या वाहनांचा वाहनचालक व्यवस्थित चालवतो आहे का! त्यांची प्रकृती ठीक आहे का! वारीमध्ये इतर पाकीटचोर, दुष्कृत्य करणारे कुणी गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक सामील आहेत का याची तपासणी केली पाहिजे. अशा लोकांवर विशेष लक्ष ठेवणे व तसे आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली पाहिजे. वारीतील ही त्यांची एक प्रकारे पंढरीच्या वारीची सेवाच आहे. ती त्यांनी स्वमनाने व आनंदाने बजावली पाहिजे. २. वारीसोबत असणा-या सर्व डॉक्टर,नर्स व कंपाऊंडर यांनी सर्व महिला व पुरुष वारक-यांची मोफत वैद्यकीय तपासणी केली पाहिजे. त्यांना योग्य तो औषधोपचार, गोळ्या,औषधे, मलम इत्यादी

त्यांच्या आजारानुसार त्वरीत दिली पाहिजे. तसेच, वारकऱ्यांच्या सामानाची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांची वैद्यकीय तपासणी

प्रथमतः केली पाहिजे. वाहनचालक वाहन चालविण्यास सक्षम आहे का हे प्रथम पाहिले पाहिजे. ही जबाबदारी पोलिसांची व डॉक्टरांची दोघांचीही आहे. वाहनचालक सक्षम नसतील तर कधी कधी अपघात होण्याची शक्यता असते. म्हणून याबाबत दक्षता घेणे अत्यंत आवश्यक असते. दिनांक १४जुलै,२०२६ रोजीच्या दै.सकाळच्या जेजुरी/वाल्हेच्या बातमीदारांकडून बातमी प्रकाशित झाली. त्या त नमूद माहीतीनुसार वारक-यांची पंढरीची वारी जेजुरी जवळ आली असताना त्या वारीतच चारचाकी वाहन घुसल्याने भिषण अपघात झाला. त्यात काही महिला वारक-यांचा मृत्यू झाला. तसेच, काही पुरुष व काही महिला वारकरी ब-याच प्रमाणात जखमी झाले. त्यांच्यावर जेजुरी रुग्णालयात स्थानिक लोकांच्या व वारक-यांच्या मदतीने वेळीच उपचार झाले. अपघाताच्या ठिकाणी आक्रोश,

किंकाळ्या, आरडाओरड अशा वातावरणात

गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती.




पण, स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमी लोकांना

आशेचा किरण दिसला. हे मदत करणारे लोक त्यांना देवदूतच वाटले. स्थानिक वारक-यांच्या मदतीने संकटाच्या वेळी रक्ताच्या नात्यापेक्षा माणुसकीचे नातेंच श्रेष्ठ असल्याचे पून्हा एकदा प्रत्ययास आले. अपघाताची बातमी समजताच

स्थानिक समाजसेवकाने व जेजुरी देवस्थानने

व १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका अशा तीन आपत्कालिन रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवून देण्यात आल्या. पण, ग्रामीण रुग्णालयात पोहोचल्यानंर जखमी वारकरी रुग्णांना वेळेवर उपचार मिळाले नाहीत. असे स्थानिक समाजसेवकाने सांगितले. भिषण अपघातानंतर


▪ लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१

वाहतूक नियोजन व वारक-याच्या प्रश्नावर शासकीय प्रशासनाकडून नियोजन नीट न झाल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अपघातात मृत झालेल्या वारक-यांचे पार्थिव त्यांच्या मुळ गावी पाठविण्याची व्यवस्था शासनामार्फत करण्यात आली. सासवड व जेजुरी मार्गावर सलग दोन दिवस प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे, वारकऱ्यांना व वाहनचालकांना तासनतास वाहतूक खोळंबा सहन करावा लागला. पर्यायी मार्गाचे अपुरे नियोजन वाहतुक नियंत्रणातील त्रुटी आणि जडवाहनांवर प्रभावी निर्बंध नसल्यामुळे वाहतूक परिस्थिती अधिकच गंभीर झाली. या परिस्थितीला जबाबदार कोण! व ही परिस्थिती सुधारण्यासाठी व वारक-यांना सुरक्षा पुरवून वारक-यांना सुरक्षितपणे वारीच्या ठिकाणापासून पंढरपूरपर्यंत वारीच्या काळात वारी निर्विघ्नपणे पुर्ण करता यावी अशी व्यवस्था शासनामार्फत व्हावी अशी नम्र सदिच्छा व विनंती असल्याचे वारक-यानी सांगितले. तसेच, वारी ज्या रस्त्यांवरुन जात असेल त्या रस्त्यांवर वाहतूकीची वाहने, जड वाहने नसावीत. त्यांचा मार्ग वेगळा ठेवावा. तरंच, वारकऱ्यांची सुरक्षितता राहील. त्यामुळे, वारकऱ्यांची पंढरीची वारी व्यवस्थित होईल. अशीही वारक-यांची शासनाकडे नम्र मागणी आहे. ज्या ज्या शहरात मनपा,नपा हद्दीत पंढरीच्या वारकऱ्यांची वारी जाईल. त्या शहरातील महापौर/अध्यक्ष यांनी वारक-यांची निवासाची, खाण्यापिण्याची, पाणीपुरवठ्याची

व पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी ही त्यांची जबाबदारी असते. अनेक अशी सुविधा या वर्षी सन २०२६मध्ये उपलब्ध झाली नसल्याचे अनेक वारकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे, वारक-यांना खूप त्रास सहन करावा लागला. इथं एक गोष्ट सर्वांना अत्यंत आत्मियतेने लक्षात घेतली पाहिजे. ती गोष्ट कशी की, आज सात शतकांनंतरही अखंडितपणे वारकरी ज्या आत्मविश्वासाने, आत्मियतेने एकनिष्ठपणे पंढरीची वारीद्वारे विठ्ठल सेवा दरवर्षी करीत आहेत. वारकरी हे विठ्ठलाचे दास आहेत. भक्त आहेत.

त्यामुळे, विठ्ठल देवाची सेवा घडण्यासाठी पंढरीच्या वारी मार्गातील उपरोक्त नमूद केलेल्या समाजातील शासकीय व निमशासकीय घटकांनी १.पोलिस खात्यातील पोलिस, इन्स्पेक्टर व तत्सम अधिकारी यांनी २.आरोग्य खात्यातील डॉक्टर, नर्स, कंपाऊंडर यांनी ३. वाहतूक खात्यातील वाहतूक पोलीसवाहतूक निरीक्षक यांनी ४. महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील महापौर/अध्यक्ष यांनी आपल्या अधिपत्याखालील कर्मचारी व अधिकारी यांना पंढरीच्या वारी कालावधीत वारकऱ्यांसाठी त्यांची सुरक्षा व योग्य त्या सोयीसुविधा उपलब्ध देणे ही सर्व वारकऱ्यांची सेवाच आहे. पर्यायाने

विठ्ठल देवाची ही सेवा आहे. ती प्रत्येकाने आत्मियतेने व आनंदाने पार पाडली पाहिजे. हीच खरी पंढरीची वारी होईल असे वाटते. अशीच इच्छा त्या जगदीश्वर पांडुरंगाची असली असे वाटते. कारण, भक्तिचं सुख हेच त्या देवाचं सुख आहे. भक्तांचा आनंद हाच पांडुरंगाचा आनंद आहे. वारकऱ्यांच्या, भक्तांच्या दु:खात लगेच धावून येणारा तो देव आहे. हे इथे अंतर्यामी लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. वासुदेव हरी! पांडुरंग हरी! जय जय विठ्ठल! जय हरी विठ्ठल! ज्ञानेश्वर माऊली! ज्ञानराज माऊली तुकाराम! बोला! पंढरीनाथ महाराज की जय!

***

# भूलोकीचे वैकुंठ, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर: भक्तीपरंपरेचा चिरंतन स्त्रोत

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

पुढे पेशवेकाळात, राणी अहिल्याबाई होळकर आणि शिंदे घराण्यासारख्या अनेक मराठा सरदारांनी या मंदिराचा मोठा जीर्णोद्धार केला, महाद्वाराचे बांधकाम केले आणि मंदिराला सध्याचे सुरक्षित व देखणे स्वरूप दिले. या शतकानुशतके चाललेल्या बांधकामाचा एकूण खर्च किंवा वेळ निश्चित आकड्यांत सांगणे कठीण असले, तरी तत्कालीन राज्यकर्त्यांनी दिलेली दाने, सोन्याच्या मोहरा आणि कोट्यवधी भाविकांची श्रद्धा यांतून उभे राहिलेले हे मंदिर आज संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अस्मितेचे सर्वात मोठे केंद्र आहे.

मंदिराची वास्तुरचना आणि प्रमुख मंडप:

पंढरपूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एका उंच टेकडीवर विठ्ठल टेकडी हे मंदिर स्थित आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराची पूर्व-पश्चिम लांबी ११७ मीटर व दक्षिणोत्तर रुंदी ५८ मीटर आहे. मंदिराला एकूण नऊ दरवाजे आहेत.

नामदेव पायरी व सामाजिक समतेचा इतिहास:

मंदिराच्या पूर्वद्वाराला महाद्वार किंवा नामदेव पायरी म्हणतात. संत नामदेव महाराजांनी त्यांच्या कुटुंबातील १४ जणांसह याच पहिल्या पायरीवर समाधी घेतली, अशी वारकऱ्यांची श्रद्धा आहे. ही पायरी पितळी पत्र्याने मढविलेली असून बाजूला नामदेवांचा पितळी मुखवटा आहे.

या पायरीच्या अगदी जवळ संत चोखामेळा यांचीही समाधी आहे. तत्कालीन सामाजिक विषमतेच्या काळात चोखोबांना मंदिरात प्रवेश नव्हता, म्हणून त्यांनी महाद्वाराबाहेरच देहाचा त्याग केला. आज विठ्ठलाच्या दर्शनाला जाणारा प्रत्येक भाविक आधी या दोन्ही संतांच्या समाधीचे दर्शन घेऊनच पुढे जातो, हे वारकरी पंथाच्या समतावादी दृष्टीचे प्रतीक आहे.

गणेश मंडप आणि गरुड मंडप:

नामदेव पायरीवरून पाच पायऱ्या चढून आत गेल्यावर प्रवेशमंडप लागतो, जिथे ३३ कोटी देवतांच्या मूर्ती असल्याचे मानले जाते. त्यापुढे पाच कमानींवर आधारलेला दगडी गणेश मंडप असून, त्याच्या वर नगारखाना आहे. याच्याच समोर गरुड मंडप आहे, जिथे वारीच्या काळात दिंड्या विसावतात आणि भजनाचे फड रंगतात.

मुख्य सांस्कृतिक मंडप:

४५ फूट उंचीच्या या मंडपाला सागवानी छत असून येथे ३० फूट उंचीच्या दोन दीपमाळा आहेत. या मंडपात समर्थ स्वामींनी स्थापन केलेली ७ फूट उंचीची मारुतीची मूर्ती, तसेच संत बोधलेबुवा, कवी प्रल्हादबुवा बडवे व कान्होबा हरिदास यांच्या समाध्या आहेत. दररोज पहाटे काकड आरतीच्या वेळी कान्होबा हरिदासांनी लिहिलेल्या आरतीचे येथे गायन होते.

खजिनामंडप व सोळाखांबी मंडप शिल्पकलेचा वारसा:

खजिनामंडपाच्या मध्यभागी पेशवेकालीन एक मोठी युरोपियन बनावटीची घंटा आहे, ज्यावर ‘ १६३६’ असे कोरलेले आहे. याच्या पुढे सोळाखांबी मंडप आहे. हा मंडप सोळा दगडी खांबांवर उभा असून त्यावर महाभारतातील विविध प्रसंग, गरुड, नाग, युद्ध करणारे राजे, व्यास, हत्ती, देवी आणि कमळांची तब्बल ६४ शिल्पे कोरलेली आहेत. काळाच्या ओघात यातील काही शिल्पे अस्पष्ट झाली आहेत. येथे संत तुकाराम महाराज आणि व्यास नारायण यांच्या प्रतिकात्मक समाध्या आहेत. गरुडखांब (पुरंदरदास खांब) हा येथील एक खांब चांदीच्या पत्र्याने मढवलेला असून तो गरुडखांब म्हणून प्रसिद्ध आहे. भाविक या खांबाला मिठी मारून पुण्याची याचना करतात.

गर्भगृह, विठ्ठल मूर्ती आणि ऐतिहासिक बदल : सोळाखांबीतून हत्तीची शिल्पे कोरलेला हत्ती दरवाजा ओलांडून चौखांबी मंडपात आणि तिथून गर्भगृहात प्रवेश होतो. चौखांबीत देवाचे शेजघर असून तिथे चांदीचा पलंग आणि शयनव्यवस्था असते.

गर्भगृहाचा दरवाजा आणि पंडित नेहरूंची सूचना:

गर्भगृहाचा चांदीचा दरवाजा पूर्वी अत्यंत लहान होता. ३० एप्रिल १९५३ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मंदिराला भेट दिली तेव्हा त्यांनी भाविकांची गर्दी आणि होणारी अडचण पाहून दरवाजा रुंद करण्याची सूचना केली. त्यानुसार खालचा उंबरा काढून चौकटीचा विस्तार करण्यात आला.

विठ्ठल मूर्तीचे स्वरूप व वैशिष्ट्ये : गर्भगृहात तीन फूट उंचीच्या चांदीच्या देखण्या वज्रपिठावर विठ्ठलाची काळ्या पाषाणाची, साडेतीन फूट उंचीची सुंदर मूर्ती उभी आहे.

मूर्तीची रचना: विठ्ठलाचे दोन्ही हात कटेवर (कमरेवर) आहेत. डोक्यावर उंच मुकुट (जो महादेवाच्या

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल**

शिवलिंगासारखा दिसतो), कानात मकराकार कुंडले आणि गळ्यात कौस्तुभ मणी आहे. छातीवर श्रीवत्सलांछन आणि श्रीनिकेतन ही विष्णूची चिन्हे आहेत. कमरेला तीन पदरी मेखला कंबरपट्टा आहे.

चरणस्पर्श आणि १८७३ ची घटना: पंढरपूरचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येक भाविकाला देवाच्या पायावर डोके ठेवून दर्शन घेता येते. इतिहासकार ग. ह. खरे यांच्या ‘श्रीविठ्ठल आणि पंढरपूर’ (१९५३) या पुस्तकातील नोंदीनुसार, १८७३ पर्यंत भक्तांना विठ्ठलाला घट्ट आलिंगन देता येत असे. परंतु, एका बैराग्याने भावविवश होऊन पायावर धोंडा टाकल्यामुळे मूर्ती दुखावली गेली. तेव्हापासून पायाला पाठीमागून धीरा (आधार) देण्यात आला आणि फक्त पायांवर डोके ठेवण्याची पद्धत सुरू झाली.

वज्रलेप रासायनिक संवर्धन: करोडो भाविकांच्या चरणस्पर्शामुळे पाषाणाची झीज होऊ नये, म्हणून पुरातत्व विभागाच्या () देखरेखीखाली वेळोवेळी मूर्तीवर वज्रलेप केला जातो.

रुक्मिणी, राही आणि सत्यभामा मंदिरे:

विठ्ठल मंदिराच्या ठीक पाठीमागे रुक्मिणी मातेचे स्वतंत्र मंदिर आहे. याचा मोठा सभामंडप निजामाचा दिवाण चंदूलाल याने बांधला होता, जिथे रुक्मिणी स्वयंवराची सुंदर तैलचित्रे लावलेली आहेत. रुक्मिणीच्या दर्शनानंतर बाहेर पडताना राही आणि सत्यभामा यांचीही स्वतंत्र पाषाणमूर्तींची मंदिरे आहेत.

नित्योपचार, सण-उत्सव आणि वारी परंपरा : मंदिरात दररोज पहाटे ४ ते रात्री ११ वाजेपर्यंत वैदिक परंपरेनुसार नित्योपचार चालतात. यामध्ये गेल्या २०० वर्षांत कोणताही बदल झालेला नाही. काकडआरती, पंचामृत पूजा, मध्यान्ह पूजा, धुपारती आणि रात्री ११ वाजता होणारी शेजारती (जी सुमारे दीड तास चालते) अशा विविध उपचार पद्धती आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, साताराचे शाहू महाराज आणि पुण्याच्या पेशव्यांनी देवाला अनेक मौल्यवान हिरे-मोत्यांचे दागिने अर्पण केले आहेत, जे सणावारी देवाला घालण्यात येतात.

वारी परंपरा: सांस्कृतिक महासंगम आषाढी आणि कार्तिकी वारीची परंपरा किमान तेराव्या शतकापासून अखंड सुरू आहे.

आधुनिक पालखी सोहळा: आज आपण जे शिस्तबद्ध वारीचे रूप पाहतो, त्याची पायाभरणी संत तुकाराम महाराजांचे सुपुत्र नारायण महाराज यांनी १६८५ मध्ये केली. त्यांनी ज्ञानोबा-तुकारामांच्या पादुका पालखीत एकत्र नेण्यास सुरुवात केली. पुढे यामध्ये शिस्तबद्ध दिंडी आणि रिंगण उभे व गोल रिंगण सोहळ्यांची भर पडली.

वर्षभरात आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री अशा चार मुख्य वाऱ्या होतात. आषाढी वारीला संपूर्ण महाराष्ट्रातून आणि शेजारील राज्यांतून सुमारे १० ते १५ लाख वारकरी पायी चालत पंढरपुरात दाखल होतात. न्या. रानडे यांच्या नोंदीनुसार, उत्तर भारतातून संत कबीरांचीही पालखी या वारीसाठी येत असे.

आधुनिक काळ: ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय आणि सामाजिक सुधारणा पंढरपूरच्या इतिहासात २०१४ वर्ष हे अत्यंत क्रांतिकारक ठरले. प्रदीर्घ काळ चाललेल्या न्यायालयीन लढ्यानंतर भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने मंदिराची व्यवस्था पारंपरिक बडवे-उत्पादक मंडळाकडून काढून पूर्णपणे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती (शासकीय मंडळ) कडे सोपवली.

या निर्णयामुळे पंढरपूर हे देशातील पहिले असे मोठे मंदिर ठरले, जिथे अधिकृत सरकारी प्रक्रियेद्वारे महिला आणि बिगर-ब्राह्मण (विविध सामाजिक स्तरांतील) व्यक्तींची सरकारी पूजक म्हणून नियुक्ती करण्यात आली. संतांनी ज्या समतेचा उपदेश आपल्या अभंगांमधून केला, त्या सामाजिक समतेचे एक मोठे व्यावहारिक पाऊल या निर्णयामुळे पडले.

पंढरपूरचे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून ते महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र आहे. यादव काळापासून ते मराठा साम्राज्यापर्यंत आणि आधुनिक न्यायालयीन सुधारणांपर्यंत या मंदिराने अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. शतकानुशतके जातीय भिंती ओलांडून माऊली या एकाच नावाने एकमेकांना साद घालणारी येथील वारकरी संस्कृती आजही भारताच्या विविधतेतील एकतेचे आणि अध्यात्माचे सर्वात मोठे प्रतीक म्हणून जगभर ओळखली जाते.